म. ग्रं. सं. ठाणें

विषय
किरकोळ

संग्रहालय क्रमांक
७
९३५

लेखक रा.रा.भा.

पुस्तकाचें नांव जाहास

९३६

सन

१०

किरकोळ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय किरकोळ
क्रं. ९३५९
१८८३

FOR TAT.

# जशास तसें

अर्थात्

रा॰ रा॰ रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं केलेल्या

## सरस्वतीमंडलाच्या स्वरूपाचें निरूपण.

रा॰ रा॰ भा॰

एक महाराष्ट्र (कऱ्हाडा) ब्राह्मण यानें केलें

तें

वार्ताहरकर्ते यांनीं

"फ्यामिली प्रिंटिंग प्रेस" मध्यें छापिलें.

सन १८८४.

किंमत ४ आणे.

(सर्व हक्क राखिले आहेत.)

माझे सर्व महाराष्ट्र बांधव यांस हें सरस्वतीमंडलांतील विचारांचें निरूपण अत्यादरानें नजर केलें आहे.

रा० रा० भा०

# प्रस्तावना.

हें ‘ उत्तर ’ लिहिल्यास आज ४ महिने होऊन गेले. कांहीं अतर्कित अडचणी आल्यामुळें निघण्यास इतके दिवस लागले. त्या अडचणी आल्या नसत्या तर जून महिन्यांतच हें बाहेर पडतें. हें जसें त्यावेळीं होतें तसेंच छापलें आहे. जातीसंबंधीं रामभाऊंचा लेख कवडीच्याही मोलाचा नाहीं असें १९व्या पृष्ठावर आलें आहे त्याचा दाखला महाजन वाडीच्या संबंधानें उद्भवलेल्या प्रकरणांत लोकांच्या नजरेस आलाच. मत्स्यभक्षण आपण जाहीर रीतीनें करतों असें सभ्य शेणवी गृहस्थांनीं शपथपूर्वक सांगितलें व रामभाऊंचें ह्मणणें तर कोणी करतात ते चोरून करितात!!! शिकार व चतुष्पाद् यांचाही प्रसंग पडल्यास सहज निर्णय करून दाखवितां येईल. सरस्वतीमंडलाच्या १५२ व्या पृष्ठावर ‘ पाध्ये ’ व ‘ पद्ये ’ कऱ्हाड्यांचे पोटभेद करून उभयतांसही कऱ्हाड्यांपेक्षां हलकें ठरविल्यामुळें मुंबईतील “पाध्ये” मंडळींपैकीं एका गृहस्थानें नोटिस

वकीलामार्फत रामभाऊंस दिली व आगष्टच्या १८ तारखेस इंदुप्रकाशांत जो रामभाऊंनीं '१५२ व्या पृष्ठावर पाध्ये शद्बाचा अर्थ प्रसिद्ध पाध्ये नांवाचीं कऱ्हाड्यांचीं घराणीं नव्हत' अशा अभिप्रायाचा लेख आपल्या सहीनिशीं आणविला आहे तो त्यामुळें, असें ऐकतों. अशा रीतीनें अस्फुट किंवा क्लिष्ट लेख लिहून नंतर अडचण येईल तेव्हां तो स्फुट करणें यांत आह्मांस तरी कांहीं रस दिसत नाहीं. १५२ व्या पृष्ठावर पाध्ये या नांवानें नांवाजलेलीं कऱ्हाड्यांचीं घराणीं येथें पाध्ये शद्बानें समजूं नयेत अशी एक टीप जर दिली असती तर त्यांत कुत्सितपणाचा गंधही न मारतां किती बरें हित झालें असतें. अखेरीस वाचकांस इतकेंच सांगणें आहे, कीं पुढील ओळी वाचून जर कोणास कांहीं शंका आल्या तर त्या खासगी पत्रद्वारें छापखान्याच्या पत्त्यावर किंवा वर्तमानपत्रद्वारें कळवाव्या. **पत्रें निनांवी असलीं तरी हरकत नाहीं.** शिव्या असल्यास त्या गाळून व सार ग्रहण करून, यथावकाश व यथामति, उत्तर देण्यास आळस होणार नाहीं.

**रा० रा० भा०**

ता० १० सप्तेंबर इसवी सन १८८४.

# जशास तसें.

अथवा

## सरस्वतीमंडलाच्या स्वरूपाचें निरूपण.

या पुस्तकाच्या संबंधानें विशेष लिहिणें हें या पुस्तकाची योग्यता वाढविण्यासारखे आहे खरें तरी ज्या अर्थी एका जातीचे दोष मुळींच न काढतां तीस अगदीं हिमालयाच्या शिखरावर चढवून तदितर जातींच्या प्रायः असतील नसतील त्या सर्व दोषांस त्या त्या जातींचें न्यूनत्व व हीनत्व दाखविण्याचे मतलबानें पुष्कळ हस्तालंब दिला आहे, त्यापेक्षां या पुस्तकाचें नांव ही न घेतल्यास सर्व महाराष्ट्र ब्राह्मणांस रामभाऊ यांनीं निरुत्तर केलें, अशा प्रकारच्या अफवा उठण्यास फारसा वेळ लागणार नाहीं; हें लक्ष्यांत आणून या पुस्तकाच्या संबंधानें थोडेंसें लिहिणें जरूर आहे.

या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर हें 'महाराष्ट्र देशांतील ब्राह्मण जातींचें वर्णन' असें लिहिलें आहे. अशा रीतीनें आरं-

मींच शेरा मारण्याचा मतलब काय असेल तो असो. पण हा शेरा पाहून जे महाराष्ट्र ब्राह्मण हें पुस्तक खरेदी करतील त्यांस पश्चात्ताप झाल्याशिवाय रहाणार नाहीं. वर लिहिलेला शेरा मारण्यापेक्षां "शेणवी जातीचा गुणपाठ व तदितर जातींची खुबीदार निंदा" असा जर मुखपृष्ठावर प्रतिज्ञालेख घातला असता तर तो चांगला साजता. "महाराष्ट्र देशांतील ब्राह्मणांचें वर्णन" पुस्तकास ह्मणावयाचें आणि ज्यांच्या ब्राह्मणत्वाविषयीं क्वचित् केचित् शंका घेतात त्यांचें वर्णन अगदीं पुस्तकारंभीं घालावयाचें, हें थोडेंसें विसंगत दिसतें. प्राचीन काळापासून ज्यांच्या योगें महाराष्ट्र देश गाजला; साधु, संत, कवि व योद्धे हे ज्यांत आजवर कैक झाले; शिवाजीच्या वेळेस जशी कायस्थांनीं तशीच किंबहुना त्यांच्यापेक्षांही अधिक मऱ्हाठेशाईचा पाया घालण्यास आपले प्राण तृणवत् करून ज्यांनीं मदत केली; राजारामाच्या वेळेस मऱ्हाठ्यांच्या स्वातंत्र्यासाठीं भांडभांडून व अखेरीस अवरंगझेबास तोबा तोबा ह्मणण्यास लावून ज्यांनीं अहमदनगरीं पिटून घातलें; अर्थात महाराष्ट्र देशांतल्या लोकांनीं ज्यांचे उपकार कालत्रयींही विसरतां कामा नये असे जर कांहीं ब्राह्मण महाराष्ट्र देशांत असतील तर ते एक देशस्थ.

संग्रहि १५८



असें असतां, त्यांचें वर्णन पहिल्यानें घालावयाचें सो-डून देऊन, रामभाऊंच्याच मतानें जे महाराष्ट्र देशांत उचल्ये व आजपर्यंत तर महाराष्ट्र देशावर स्मरणीय असे उपकार ज्यांच्या हातून झाल्याचें कोणास ही स्मरण नाहीं; इतकेंच नव्हे तर उचल्ये असल्यामुळें ज्यांच्या षट्कर्मत्वा-विषयीं महाराष्ट्र ब्राह्मणांस शंका येणें उचितच आहे, त्या शेणव्यांचें वर्णन पहिल्यानें घालून, त्याच्या योगानें ८२ पृष्ठें ह्मणजे परिशिष्टविरहित जवळ जवळ पुस्तकाचा अ-र्धा भाग भरून टाकिला आहे (परिशिष्ट तर शेणव्यां-नींच सगळें भरलेलें आहे असें ह्मटलें असतां चालेल) व तदनंतर पहिलीं दहा पृष्ठें ज्यांच्या ब्राह्मणत्वाची आज पुष्कळ दिवस ओढाताण चालली आहे असल्या पळ-शांच्या वर्णनास दिलीं आहेत. सारांश ज्यांचें ब्राह्मणत्व वादग्रस्त व जे त्यांच्याच ह्मणण्यावरून 'महाराष्ट्र' नव्ह-त, आणि ज्यांच्या हातून महाराष्ट्र लोकांनीं चिरकाल ध्या-नांत वागवावा असा कोणत्याही प्रकारचा उपकार आज-पर्यंत झाला नाहीं त्या शेणव्यांच्या व पळशांच्या वर्णनानें अर्धें अधिक पुस्तक पहिल्यानें भरून काढितात आणि नंतर सर्व पुस्तकास "महाराष्ट्र ब्राह्मणांचें वर्णन" असें भपकेदार नांव देण्यास त्यांस किमपिही संकोच वाटत

नाहीं, हें पाहून आह्मांस सखेद आश्चर्य होतें.

रामभाऊंस मुंबई शहर हें महाराष्ट्र ब्राह्मणांचें आद्यस्थानच वाटल्यामुळें त्यांनीं तेथून आरंभ केलेला दिसतो. परंतु आमच्या मतें जर महाराष्ट्र देशांतील ब्राह्मणांचें वर्णन त्यांस खरोखरच कर्तव्य होतें तर सातारा, दौलताबाद, पुणें किंवा याहून ही उत्तमस्थान म्हटलें म्हणजे महाराष्ट्र देशाची नांवाजलेली प्राचीन राजधानी पैठण हें होतें. महाराष्ट्र देशांतील ब्राम्हणांचें वर्णन जर कर्तव्य आहे तर पैठणांचें व त्यांतील ब्राम्हणांचें वर्णन पहिल्यानेंच आलें पाहिजे. मुंबई म्हटली म्हणजे मूळची कोळ्यांची भूमि. तींत महाराष्ट्र देशांतील ब्राम्हण येण्यास लागून आज पुरीं पन्नास वर्षें ही झालीं नाहींत. तरी चमत्कार हा कीं, 'महाराष्ट्र देशांतील ब्राम्हणांचें वर्णन' म्हणून आरंभ करावयाचा मुंबईपासून! मुंबईंत शेणव्यांची वसाति बऱ्याच वर्षांपासून असल्यामुळें मात्र तीस रामभाऊंनीं प्राधान्य दिलेलें दिसतें. पण महाराष्ट्र देशांतील 'ब्राम्हणांचें वर्णन' असें व्यापक नांव देऊन महाराष्ट्र देशाच्या इतिहासाबरोबर व ब्राम्हणांबरोबर आजपर्यंत केवळ सर्व प्रकारें असंबद्ध अशा मुंबईसारख्या स्थलास या पुस्तकांत आदिस्थान दिलें हें त्यांनीं उचित केलें नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

'"सारस्वत ब्राह्मण हे फार प्राचीन म्हणून त्यांचें पहिल्यानें वर्णन केलें आहे व त्या वर्णनाचा इतर ब्राह्मणांच्या वर्णनास उपयोग झाला आहे" या रामभाऊंच्या प्रस्तावनेंतील म्हणण्यांत कांहीं जीव आहे असें आम्हांस वाटत नाहीं. शेणवी हे सारस्वत ब्राह्मण खरे, हें पाहिल्यानें सिद्ध झालें पाहिजे. तें जरी यथा कथंचित् सिद्ध झालें, तरी "सारस्वत" हे सर्व ब्राह्मणांत प्राचीन असें ह्मणण्यास प्रमाण काय? आणि त्यांचें पहिल्यानें वर्णन केलें त्याचा इतर ब्राह्मणांच्या वर्णनाशीं उपयोग तो काय झाला? चवथ्या व पांचव्या पृष्ठांवर गौडांचे जे पांच भेद दिले आहेत ते सर्वसंमत असून दुसऱ्या रीतीनें भेद केलेले सह्याद्रिखंडांत नाहींत कीं काय? जर पाठांतरें वरींच असल्यामुळें दाखल केलेले भेद सर्वसंमत नाहींत असें ह्मणणें जरूर पडतें तर बाकी श्लोक गाळून अमुकच श्लोक रामभाऊंनीं कां उतरून घ्यावा? त्या श्लोकांत सारस्वताचें नांव पहिल्यानें आलेलें असल्यामुळें सारस्वताचें इष्ट जें वडिलपण तें सिद्ध करण्याच्या हेतूनें तर तो श्लोक दाखल केला नसेलना? शेणवी हे सारस्वत असा संबंध जुळवून सारस्वतांचें नांव पहिल्यानें घातल्यानें शेणव्यांचें वडिलपण सिद्ध झालें, असें

रामभाऊंस वाटत असेल व शेणव्यांमध्यें जे अज्ञानी असतील त्यांस ही रामभाऊंची कोटि मोठी शास्त्रीय कदाचित् दिसेल. पण इतर ब्राह्मणांसच नव्हे तर यच्चयावत् विवेकशक्ति ज्या पुरुषाची ह्मणून विकृत झालेली नसेल त्याला ही जाडी कोटि पाहून हसें आल्याशिवाय रहाणार नाहीं. सारस्वत हे ब्राह्मणांत वडील कां? तर एका पाठांतरांत त्यांचें नांव पहिल्यानें आलें आहे. व रामभाऊंचा शेणवी हे 'सारस्वत' असा समज असल्यामुळें ते वडील असें सिद्ध करणें त्यांस इष्ट आहे!!! पाश्चात्य लोकांचें ह्मणणें तर ब्राह्मण हे "काकेझस" पर्वताजवळून मूळचे आलेले असें आहे. पंजाबांतील सरस्वती नदी हें ब्राह्मणांचें आद्यस्थान, हें ह्मणणें रामभाऊंचें; पाश्चात्य लोकांचें नव्हे.

चवथ्या पृष्टावर रामभाऊच 'द्राविड' हे पहिल्यानें हिंदुस्थानांत आले असें ह्मणतात. नंतर गौड हे वडील ठरवितात! जर द्रविड हिंदुस्थानांत पहिल्यानें आले तर द्राविड वडील कीं गौड वडील? बरें द्रविड कालज्येष्ठ होते ह्मणून काय झालें? गौडांची विद्याज्येष्ठता तर कायम आहे असें ही ह्मणतां येत नाहीं. अगस्ति सारिखे ऋषि, ज्यांचीं नांवें पाणिनीनें आपल्या व्याकरणांत दाखल केलीं आहेत ते, द्राविडांचे सूत्रकार होत. द्रविड भाषेचें व्याकरण पहिल्यानें अगस्त्य

ऋषीनें रचलें. त्याप्रमाणेंच तेलंगी भाषेचा आद्य व्याकरण-सूत्रकार कण्व ऋषि होय. शंकराचार्य वगैरे आचार्य मंडळी तर सर्व द्रविडमंडळी. ते जो रस्ता दाखवितील त्या रस्त्यानें गौड जावयाचे. तेव्हां गौडांस विद्याज्येष्ठत्व तरी येतें कसें? कालज्येष्ठत्व रामभाऊंच्याच ह्मणण्यानें येत नाहीं व विद्याज्येष्ठत्व सदरील कारणांनीं येत नाहीं. तर मग गौड वडील कसे? आपणास अभिमत जे गौडांचे पांच भेद ते किती प्राचीन आहेत तें पहिल्यानें सिद्ध करायाचें पण तें सर्व सोडून एकदम त्रेतायुगांतील परशुरामास रामभाऊ सारस्वत करतात! त्रेतायुगाची व द्वापर युगाची तर गोष्ट राहूं द्या. शा० शकाच्या पांचव्या व सहाव्या शतकांत रामभाऊंस अभिमत हे भेद प्रचारांत होते असें ह्मणण्यास कांहीं प्रमाण आहे काय? जर सारस्वत ही संज्ञा पहिल्यानें नव्हती [ पृ० २ ] तर वाल्मीकि वगैरे मंडळीस काय समजून रामभाऊ सारस्वतांत घालतात? व्यासाची आई कोळीण असा आमचा समज होता. ती एका शेणव्याची मुलगी हा शोध रामभाऊंचा अपूर्व होय! जर सरस्वतीचा 'प्रवाह तेथून निघाला' ह्मणून वाल्मीकिप्रभृति मंडळी शेणवी (सारस्वत) रामभाऊंनीं बनविली! तर मोक्षमूल्लर, मोनियर वुल्यम्स, वेबर, वुल्हर वगैरे मंडळीस दुसऱ्या आवृत्तींत सारस्वतत्त्वाचा टिळा

लागून शेणवीपणाच्या सौभाग्याचा लाभ होणारच असें अनुमान निर्बाध निघतें.

तशांत सर्व ब्राह्मण सरस्वतीच्या तीरावर रहात होते असें ही नाहीं. रामभाऊच ह्मणतात कीं ते पंजाबांत पसरले होते. जर सरस्वतीवरचे "सारस्वत" तर विपाशेवरचे "वैपाश" वगैरे असले पाहिजेतच. असें असतां व्यास आला तो सारस्वत (शेणवी); परशुराम आला तो सारस्वत (शेणवी); कपिल आला तो सारस्वत (शेणवी); कणाद आला तो ही सारस्वत (शेणवी)! सारांश, पंजाबांतील सर्व ब्राह्मण सरस्वतीच्या तीरावरचे; विपाशादिकांच्या तीरावरील कोणी नाहीं! ही माहिती यांनीं कोणत्या "जर्नल" मधून काढली? दधीच ऋषीचा मुलगा सारस्वत ह्मणून होता. येथें सारस्वत हा शब्द व्यक्तिवाचक असून तद्धितांत होय. त्याच्या आईचें नांव सरस्वती, ह्मणून त्यास "सारस्वत" ह्मणूं लागले; कुंतीवरून अर्जुनास कौंतेय ह्मणूं लागले त्याप्रमाणें. या सारस्वत शब्दाचा व जातिवाचक सारस्वत शब्दाचा कांहीं संबंध नाहीं. हें जात्यभिमानाचें पित्तखवळल्यामुळें ज्यास श्वेत असेल तितकें पीत भासूं लागलें नाहीं त्यास सांगितलें पाहिजे असें नाहीं. तरी सारस्वता-

चा ससेमिरा लागल्यामुळें दधीचाचा मुलगा सारस्वत यानें मत्स्य खाऊन वेदरक्षण केल्यामुळें सारस्वत ब्राह्मणांचा महिमा वाढत गेला, असें रामभाऊ ह्मणतात.

९ व्या पृष्ठावरील दिग्विजययज्ञाचें विशेष व्याख्यान रामभाऊंनीं केलें तर बरें होईल. हा सारस्वतांस मात्र "दिसलेला" अपूर्व यज्ञ दिसतो. सारस्वतांस व शेणव्यांस जे अग्रहार मिळाले त्यांचा तपशील जर रामभाऊ तारीखवार व वर्षवार देतील तर R. A. S. वर त्यांचे केवढे बरें उपकार होतील? पण चित्पावनांनीं व कऱ्हाड्यांनीं कदाचित् शेणव्यांच्या द्वेषानें सर्व शिलालेख फोडून व ताम्रलेख घांसून टाकून सनदा पत्रांवर इनाम कमिशनी तर करून टाकली नसेलना !!!

देशस्थ हे मूळचे शेणवी, असें माजी आनरावल देशमुखसाहेब ह्मणतात; व तें तसें असेल. पण पृष्ठाचा अंक रामभाऊ विसरल्यामुळें दाखला दुर्लभ झाला आहे. तरी लोकहितवादी ह्मणतात व रामभाऊंस तें इष्ट आहे. त्यापक्षीं तें खरें असलेंच पाहिजे! श्रीमच्छंकराचार्यांची कीर्ति हिमालयापासून ती सेतुरामेश्वरपर्यंत पसरली आहे. वाचस्पतिमिश्रासारख्या विचारी, श्रीहर्षासारख्या परमतखंडणनिपुण व कृष्णमिश्रासारख्या नाटकप्रिय गौड

देशांतील स्त्रियांनीं त्यांचे लेख पुष्पमालेप्रमाणें आपल्या मस्तकावर ठेवले आहेत. शेणव्यांनीं त्यांस मानिलें किंवा न मानिलें तर त्यापासून त्यांचा मान कांहीं वाढतो किंवा कमी होतो असें नाहीं. नांव ह्मणाले "गौडपाद" ह्मणून तो गौड होता इतकेंच नव्हे, तर सारस्वत असून शेणवीही होता! असें नसतें तर "गौडपाद" असें नांव त्याचें आईबापांनीं कसें ठेविलें असतें? खाशी कल्पना!

२३ व्या पृष्ठावर सर्व महाराष्ट्रभर पौरोहित्य गोळकांचें होतें असें रामभाऊ ह्मणतात. पण त्यास आधार काय? कोल्ह्याच्या हातास द्राक्षें येत ना, ह्मणून त्यास तीं आंबट झालीं! शेणव्यांच्या हातास इतर जातींचें व देशस्थादिक ब्राह्मणांचें पौरोहित्य लागत नाहीं, तेव्हां त्यास सहजच त्याचा कंटाळा आला व ते तें हलकें समजूं लागले. असा लेख घुसडण्याचा वेळीं रामभाऊंनीं नीट विचार केलेला दिसत नाहीं. वसिष्ठादिक महर्षींनीं पौरोहित्य रघुवंशादिकांचें लाज न मानितां व हलकें न समजतां केलें. जर देशस्थप्रभृति ब्राह्मणमंडळी त्या वसिष्ठादिकांचें वंशज होत, तर त्यांस तें केल्या विना गति नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांतही पौरोहित्य प्रकरणांत "यस्यैवं विद्वान् ब्राह्मणो राष्ट्रगोपः पुरोहितो भवति" असे ठिकठिकाणीं शेरे मारले

संनकिय



आहेत. जर पौरोहित्याचा शेणव्यांस कंटाळा आहे तर षट्कर्मत्वाचा व ब्राह्मणत्वाचाही त्यांस कंटाळा आला असें ह्मटलें पाहिजे. जर पौरोहित्य नको, तर याजन नको व प्रतिग्रहही नको असें झालें. अर्थात् त्यांचीं दोन कर्में गळून बाकी चार राहिलीं. जर याजन नाहीं तर अध्ययन झालें तें वागणार कसें व जर तें वागलें नाहीं तर यांच्या हातून अध्यापन होणार कसें? तेव्हां याजनाचा अभाव झाला ह्मणजे अध्यापनाचाही अभाव होऊन त्रिकर्मांपर्यंत मजल आली! असें जर आहे तर शेणव्यांस त्रिकर्मी ह्मटल्यानें वाईट कां वाटतें? शेणव्यांस ब्राह्मणत्व तर पाहिजे, पण ब्राह्मणांचीं कर्में नकोत! शेणवी पुरोहितांचें अध्ययन फारसें आजपर्यंत नसे तर चित्पावनांची व कऱ्हाड्यांची मदत घेतल्या शिवाय त्यांच्या हातून पौरोहित्य तरी कसें होणार? पण असें ह्मटल्यानें शेणवी जातीस न्यूनत्व येतें ना! याच पृष्ठावर रामभाऊ ह्मणतात कीं शेणव्यांस शूद्रादि जातींत पौरोहित्य करणें आवडत नाहीं. तर शेणव्यांस ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य या तीन वर्णांमध्यें पौरोहित्य करण्यास आवडतें, असें यांच्याच शद्बांवरून झालें. तें आवडलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. पण या तीन जातींमध्यें शेणव्यांचें पौरोहित्य कांहीं दिवस पर्यंत तरी चालत

आहे असें ह्मणण्यास रामभाऊं जवळ कांहीं आधार आहे काय?

३१ व्या पृष्ठावर पंतोजीपणाचें काम कोंकण पट्टींत पूर्वीं सारस्वत ब्राह्मणांचें असें ह्मणतात. बत्तिसाव्या पृष्ठावर जयगडच्या खाडीपासून लेखणीचे स्थायिक 'अधिकारी' शेणवी असें ठरवितात!

२९व्या पृष्ठावर सावाजी अनंत चतुर हाही शेणवी ठरतो.

१७८व्या पृष्ठावर गोवा प्रांतांतील शेणव्यांनीं किवंतास मुली दिल्या व त्यांच्या आपण केल्या असें ह्मणतात. पण हें सर्व ह्मणण्यास आधार काय? असल्या ठिकाणीं तर आधार अवश्य दिला पाहिजे होता. पण लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं, रामभाऊंनीं दाखल करायाचे आधार दाखल न केल्यामुळें अनेक कुतर्क वाचणाराच्या मनांत येतात. कित्येक ठिकाणीं तर शेणवी जातींतील पुरुषांस आकाशावर चढविण्यासाठीं इतिवृत्त अन्यथा करून, शुद्ध अतिशयोक्तिमूलकलेख यांनीं लिहिलेले आढळतात.

३३व्या पृष्ठावर छत्रपतींचे मंत्री शेणवी होते, असें ह्मणून पुढें उपसंहारांत शिवाजी महाराजांनीं आश्रय देण्याचें अभिवचन दिलें असा लेख, तेव्हांपासून शेणव्यांस मंत्रिपद मिळालें अशी शंका रहावी एतदर्थ, खुबीनें लिहितात. खरोखर

पाहिलें असतां शिवाजी महाराजांचा मंत्री शेणवी नव्हता व तो असण्याचा संभव ही दिसत नाहीं. शके १६३९ च्या सुमारास नारो राम शेणवी यांस शाहू महाराजांकडून मंत्रिपद मिळालें व अजून ही तें त्यांच्या वंशांत कायम आहे. पण मऱ्हाठेशाईचा पाया घालणाऱ्या पुरुषा-बरोबर शेणव्यांचा संबंध ओढून ताणून आणण्यासाठीं रामभाऊंनीं मोठी खुबी केलेली दिसते.

३६ व्या पृष्ठावर रामचंद्र बाबा शेणवी यास अगदीं गुणनिधान करून टाकलें आहे. रावसाहेब विश्वनाथ ना-रायण मंडलीक डा० भाऊ दाजीस पित्याप्रमाणें मानीत रामचंद्र बाबास नानासाहेब पेशवे व सदाशिवराव पित्या-प्रमाणें मानीत!!! नाना साहेब पित्याप्रमाणें मानीत ह्मणूनच रामचंद्र बाबानें दोन भावांमध्यें फूट पाडून सदाशिवरावास कोल्हापुरकराकडेस नेलें नसेलना!!! नेण्याचें कारण रामचंद्र बाबा हे पैशास थोडे लुब्ध असल्यामुळें त्यांनीं पेशव्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करावी हें नानासाहे-बांस आवडेना. सदाशिवराव भाऊमध्यें जात्याभिमान नसल्यामुळें त्यानें आपल्या बंधुचाही आपल्या एका शे-णवी मित्रासाठीं वियोग सोसला. तरी पुढें रामभाऊ म्हणतात कीं, चितपावनांस जात्याभिमान मोठा, म्हणून ते दुसऱ्या

जातींतील पुरुषाचें हित करीत नाहींत!!! अस्तु.

२७ व्या पृष्टावरून पहातां महादजी शिंदा नव्हताच. जें कांहीं महादजी शिंद्यानें केलें तें सर्व जिवबा दादा होता म्हणून. पण इतिहासावरून पहातां तर महादजी शिंदा नेयबुद्धि नव्हता. शिवाजी सारिखे व पहिल्या बाजीरावासारखे पुरुष स्वतः कर्ते असतात, व म्हणून ते दुसऱ्या कोणाही पदरच्या पुरुषाचें फारसें चालूं द्यायाचे नाहींत. महादजी शिंदा हा पुरुष त्यांच्या वर्गांतला. असें असतां त्याचें नांव नाहीं! आणि स्तुति सर्व गायली त्याच्या पदरीं जिवबा दादा म्हणून एक शेणवी होता त्याची! जिवबा दादा शूर होता म्हणून त्याच्या कर्त्या धन्याचा अपलाप करून केवळ जिवबा दादाचा स्तुतिपाठ गाणें हें निःपक्षपातानें लेख लिहिणाराचें काम नव्हे. पुढें एका पृष्ठावर शेणव्यांनीं ‘राज्यांचीं राज्यें उभारलीं’ अशी बढाई मारली आहे. असल्या बढाईमुळे शेणवी लोकांमध्यें रा. ब. शंकरराव पंडित, प्रो. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व आन. काशिनाथ त्रिंबक तेलंग, यांच्या सारखे जे विचारी आहेत त्यांस खेद झाल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. राज्यांचीं राज्यें शेणवी लोकांनीं उभारलीं केव्हां? अलीकडील महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत हे शा-

द्व लागू होतील एक शिवाजी महाराजांस मात्र. रामभाऊं-नीं हे शद्ब जिवबा दादा सारख्यास लावून त्यांचा वास्तविक अर्थ मात्र कमी करण्यास यत्न केला हें पाहून आम्हां-स फार वाईट वाटतें. पोलिस खात्यांत येथील अकबर अल्ली प्रमाणें व अबदुलअल्लीप्रमाणें काम करणारे शिवराम पांडुरंग केरकर यांस रामभाऊंनी 'शूरपुरुष' ठरविलें! व जिवबा दादां सारख्यांच्या माळिकेंत गोंवलें!!! बंगाल्यांतील "टागोर" घराणें ह्मणतें कीं वेणी संहाराचा कर्ता 'नारायण भट्ट' आमच्या पूर्वजांपैकीं; व रामभाऊ ह्मणतात कीं, भट्टोजीदीक्षित शेणवी होता. असेल तो शेणवी. पण आपलें वाक्य वेदवाक्य समजलें जाणार नाहीं, हें लक्षांत आणून जर रामभाऊंनीं आधार दाखल केला असता तर चांगलें झालें असतें.

४२ व्या पृष्ठावर विठ्ठल नरसिंह वीडकर कवि यांस शेणवी ठरवितात. पण यास आधार? तो तर होता दे-शस्थ असें ऐकतों. सारांश अशा रीतिनें अतिशयोक्ति करून व इतिवृत्त अन्यथा करून, जातिसंबंधीं पोकळ घमंडी मिरविणें रामभाऊ सारख्या सुज्ञ, विचारी व पोक्त पुरुषाच्या हातून कसें झालें याचें आह्मांस मोठें नवल वाटतें.

४३ व्या पृष्ठावर शेणवी या शद्बाची व्युत्पत्ति

फारच विलक्षण दिली आहे. 'शेणवी' हा शद्ब 'शर्मन्नार्य' या संबोधनाचा अपभ्रंश असावा असा रामभाऊ तर्क करितात. 'चीन' हा 'शेणवी' शद्बाचाच अपभ्रंश किंवा 'शेणवी' हा 'चीन' शद्बाचा असेल; किंवा 'शिनार' ह्मणजे 'बाबिलोन' या शद्बाबरोबर ही शेणवी शद्बाचा संबंध कदाचित् असेल. इतकें कशाला पाहिजे. 'व्यासज' या शद्बाचाच 'शेणवी' अपभ्रंश ह्मटला असतांही चालेल. 'र्मन्' याच्या स्थानीं 'ण' झाला यांत विलक्षण (उदाहरणाची तर गरज नाहींच!) नाहीं, त्याप्रमाणें 'व्या' च्या ठिकाणीं 'शे' झाला तर त्यांत ही कांहीं विलक्षण नाहीं. नंतर 'सज' याच्या ठिकाणीं 'णवी' झालें असें मानलें ह्मणजे 'शेणवी' शद्ब निष्पन्न झाला. संबंधही बरोबर जुळतो! व्यासानें महाभारत आपल्या शिष्यांस शिकविलें व शेणवी रामभाऊंच्या ह्मणण्याप्रमाणें कोंकणपट्टींत त्रेता युगापासून पंतोजी असल्यामुळें 'श्रि श्री श्री श्री' आजपर्यंत शिकवित आले !!! तेव्हां 'शेणवी' हा 'व्यासज' याचा अपभ्रंश खरा !!! 'शर्मन्नार्य' याप्रमाणें दोनही संबोधनें जोडलेलीं असून त्यांचा अपभ्रंश झाला असें एकादें उदाहरण रामभाऊंनीं द्यायाचें होतें तें का

दिलें नाहीं? याप्रमाणें मनःपूत निर्वचनें देऊन, कांहींना कांहीं रामभाऊ वरळत जातात हें पाहून आह्मांस अतिशय दुःख होतें. दशप्रकरणकार केणी शास्त्री 'गोमांतक' शद्बाची व्युत्पत्ति 'गोमा' गाईस मारणारे अर्थात् फिरंगी त्यांचे 'अंतक' अंत करणारे पराजय करणारे (?) अर्थात् शेणवी, यांचा प्रांत ह्मणून 'गोमांतक' हें नांव मिळालें अशी गोमांतक शद्बाची व्युत्पत्ति करितात व रामभाऊ 'शर्मन्नार्य' (आर्य ब्राह्मण) याचा अपभ्रंश 'शेणवी' झाला असें ठरवितात. अशा व्युत्पत्तिमुळें केणी शास्त्र्यांच्या पंक्तींत रामभाऊंस घालावें लागतें ह्मणून आह्मांस मनापासून खेद होत आहे. शेणवी शद्बांची निर्वचनें दाखल केलीं आहेत त्यांत सनत्कुमार संहितेंतील "भोगिन्यः षण्णवर्तिर्नैकवर्णाश्च तत्रहा कामुकस्य भविष्यंति कस्यापि मरुभूभुजः ॥ ४ ॥ तदपत्यानि तावंति शेणवीति प्रथां क्षितौ । गमिष्यंति ॥ ५ ॥ अ० ५८ हें निर्वचन निंदाकर असल्यामुळें तर दाखल केलें नसेलना? या व जातिभेदविवेकसारांतील निर्वचनांत कांहीं अर्थ आहे असें आमचें ह्मणणें नाहीं. पण होतें तसेंच दिलें असतें तर बरें झालें असतें. सर्व निर्वचनांत 'शेणवी' हा 'शहानवीस' ह्मणजे "राजाचे कारकून"

या शद्वाचा अपभ्रंश मानणें सयुक्तिक दिसतें, व हें निर्वचन आह्मांस सादर केल्याबद्दल आह्मीं रामभाऊंचे उपकार मानितों. जसे कायस्थ पुष्कळ ठिकाणीं कुळकरणी आहेत, त्याप्रमाणें 'शेणवी' ही आहेत तेव्हां ही व्युत्पत्ति आह्मांस अधिक संभाव्य दिसते. आतां असा 'फारशी शद्ब प्रचारांत येण्याचा प्रसंग व कारण' शेणवी जातीच्या मनःकल्पित गुणांनीं रामभाऊंची दृष्टी दिपवल्यामुळें त्यांस दिसत नाहीं तेथें आमचा नाइलाज आहे. पण जर 'चिटनवीस, पोतनवीस, सबनवीस' वगैरे फारशी शद्ब सांवतवाडी प्रांतांत पुष्कळांचीं आड नांवें बनून गेले आहेत, तर 'शहानवीस' हेंही एक जातिवाचक नांव बनून गेलें असें ह्मणण्यास काय बाध आहे?

आतां शेणव्यांच्या रीतिभाती विषयीं थोडासा विचार करणें जरूर आहे. जी पाठीं गेलेल्या पृष्ठांत मनःपूतता दृष्टीस पडली, तीच या भागांत ही आढळली. जसे कित्येक ब्राह्मण शाक्त मतांत असतात ते चोरून मत्स्यमांस सेवन करितात त्याप्रमाणेंच शेणवी असें ९३ व्या पृष्ठावर रामभाऊ ह्मणतात. पण हें ह्मणणें शुद्ध जात्यभिमानाचें दिसतें. ज्याला निष्पक्षपातानें वर्णन करायाचें त्यानें सर्व अभिमान गुंडाळून यथार्थवादी झालें पाहिजे. रामभाऊ यथार्थवादी

असें आह्मांस आजपर्यंत वाटत होतें, पण आतां तो समज दूर झाला. जातीचा जेथें दूरतः तरी संबंध आहे तसल्या ठिकाणीं रामभाऊंचा लेख कवडीच्याही किमतीचा नाहीं असें ह्मणणें भाग पडतें. महाराष्ट्र देशांत शाक्तमताचा प्रचार आजपर्यंत फार होता हा रामभाऊंचा लेख निराधार होय. शाक्त मत हें मूळचे गौड, त्यामुळें त्याचा अंमल गौड देशांत अव्याहत. जर महाराष्ट्र देशांत तें मत आलें हें खरें तर तें गौड ह्मणविणाऱ्या 'शेणव्यांनीं'च आपल्या बरोबर आणलें असावें. तरी त्याचा देशस्थ चित्पावन व कऱ्हाडे या लोकांत पुष्कळ प्रचार होता किंवा आहे यास प्रमाण काय? ज्यांच्यावर शाक्तमताचा संशय येतो त्याच्याबरोबर संबंध बाकीच्यांचा मुळींच रहात नाहीं. शाक्तता ब्राह्मणाची महाराष्ट्रांत नजरेस आली व त्यास प्रायश्चित घ्यावें लागलें नाहीं असें उदाहरण रामभाऊंस दाखवून देतां येईल काय? विवाहादि प्रसंगीं शेणवी मत्स्यादि आणीत नाहींत ह्मणून काय त्यांच्यांत तें खाण्याचा प्रघात नाहीं असें होतें? देवक बसल्यानंतर प्रभु लोकांकडेस तरी देवक उठेपर्यंत मांसादिव्यवहार होतो काय? नाहीं. ह्मणून काय प्रभू मत्स्यमांस घरांत रोज खात नाहींत? अमुक पुरुष मत्स्य खातात ह्मणून, किंवा त्यांच्या बायका मत्स्य

खातात ह्मणून, त्यांस बहिष्कृत केलें असें उदाहरण एक तरी रामभाऊंनीं दाखवावें. शेणव्यांत मुंबईकरांमध्यें शेंकडा वीस किंवा पंचवीस तरी पुरुष मत्स्य सोडलेले दाखवितां येतील; पण बायकांत शेंकडा पांच देखील सांपडणें कठिण पडेल. सांवतवाडीकर बहुतेक शेणव्यांस उघडपणें शिकार व चतुष्पाद चालतें ह्मणून त्यांस मुंबईकर शेणवी कमी समजतात व नरवाणे ह्मणतात हें काय रामभाऊंस माहित नसेल? कृष्णाजी अनंत सभासद यांस शिवछत्रपतींच्या चरित्रांत 'मत्स्याहारी' ह्मणतो तें काय तशी प्रसिद्धि त्याच्या वेळीं असल्याशिवाय? असें असतां, उगीच छुपवाछुपव करीत बसणें हें आम्हांस तर मोठें साहस दिसतें. अशी छुपवाछुपव केल्यानें काय मत्स्यमांसभक्षण शेणवी जातींतील कमी होईल?

७२ व्या पृष्ठावर 'स्वैपाक करणें, पाणी भरणें वगैरे कामें शेणवी हलकीं समजतात' असें रामभाऊ ह्मणतात. कदाचित् रामभाऊ तसें समजत असतील. पण हीं कामें जर हलकीं तर भटारखाना ठेऊन पाव बिसकुटें करून विकणें व भज्यांचीं दुकानें घालणें हीं कामें हलकींच ह्मणावीं लागतील असें आह्मांस वाटतें. 'इतर लोकांच्या घरीं स्वैपाक वगैरे करण्यास शेणवी रहात नाहींत' अशी

फुशारकी रामभाऊ मारतात. पण कोणत्या इतर जाती यांस आपल्या घरीं स्वैपाकास ठेवण्यास खुशी आहेत तें रामभाऊ शोध करून कळवितील तर बरें होईल. आह्मी तर असें ह्मणतों कीं, मत्स्यादिभक्षणामुळें इतर जाती यांस ब्राह्मणांच्या बरोबर लेखीत नाहींत, व त्यामुळें यांस आपल्या घरीं स्वैपाक वगैरे करण्यासाठीं ठेवण्यास राजी नाहींत इतकेंच नाहीं, तर यांच्या हातचें पाणी देखील घेत नाहींत. यांच्या जातींत चाकर मिळण्यास अडचण पडल्ये त्याचें एक कारण, यांच्यामध्यें कुडाळदेसकर, बारदेसकर, भालवलकर वगैरे पोट भेद पुष्कळ आहेत ते एकमेकांस हलके समजतात. कुडाळदेसकर ह्मणतात 'आह्मीं मुंबईकरांकडेस व वाडीकरांकडेस जेवीत नाहीं' व मुंबईकर ह्मणतात 'आह्मीं कुडाळदेसकरांच्या हातचें पाणी देखील घेत नाहीं.' अशा रीतीनें एकमेकांत द्वेष असला ह्मणजे शागीर्द मिळणार कसा? दुसरें कारण हें कीं, यांचे घरीं मत्स्यादिकांचा प्रचार असल्यामुळें व बाणकोट्याचें पाणी चालत असल्यामुळें कोणी महाराष्ट्र ब्राह्मण राहूं इच्छीत नाहींत. तेव्हां यांस शागीर्द फारसा मिळत नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. तरी भालवलीकर वगैरे मंडळी पाणक्याचें वगैरे शेणव्यांचे घरीं काम करणारी मुंबईंत नाहीं असें

नाहीं. तीस ब्राम्हणांबरोबर लेखून इतर जाती जर आश्रय देत्या किंवा देशस्थ वगैरे ब्राह्मणांत जर तीस आश्रय मिळता तर ती काय वाढली नसती? शेंकडा नव्याण्णव घरीं वाणकोम्याचें पाणी स्नानादिकास चालत असल्यामुळें शेणव्यांस पाणक्याची फारशी गरज लागत नाहीं. जर वाणकोटी सर्व काम करणारा महिना एक रूपया देऊन मिळतो तर आपल्या जातीचा दोन आणे अधिक देऊन फक्त पाणी आणण्यासाठीं किंवा स्वैपाक करण्यासाठीं कोण ठेवितो? तेव्हां शेणवी जातीच्या शागीर्दांची संख्या वाढत नाहीं यांत कांहीं विशेष नाहीं. हीं खरीं कारणें असतां तीं दाबून उगीच शेखी मिरवित बसणें गांवस्करासारख्या पांडितांस शोभलें असतें, रामभाऊसारख्या विचारी मनुष्यास शोभत नाहीं. पुण्यांत ब्राम्हणांस कांहीं दिवस हजामांनीं नाडल्यामुळें आपापसांत हजामती करणें भाग पडलें हें खरें आहे. पण मुंबईत आपत्काळ नसतां ही चर्मी जोड्यांची दुकानें काढून चर्मकार शेणव्यांस बनण्यास कांहीं हरकत वाटली काय? गोमांसासारखा हिंदु मात्रास सर्वथा अस्पृश्य पदार्थ आगबोटीवर पुरविण्याचा मक्ता घेऊन श्रीमंत झालेल्या पुरूषास रामभाऊंच शेणवीसन्मणिमालेंत गुंफण्यास चुकले नाहींत. आपत्काळीं ह-

ज्ञाम होण्यानें कांहीं हिंदुत्व जात नाहीं.

७३ व्या पृष्ठावर "कोणी शेणव्यानें आपल्या राजापासून जहागीर आपणास करून घेतली नाहीं" वगैरे लेख आहे तो अगदीं पोकळ होय. तुरगब्रम्हचर्याची व त्याची मातबरी आह्मी एकच समजतों. प्ऱ्हाद निराजी रामचंद्र नीळकंठ, बाळाजी विश्वनाथ वगैरे मंडळीच्या हातांत कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं जशी सत्ता होती तशी जर एखाद्या शेणवी गृहस्थाच्या हातांत असती आणि ती तशी असतां जर स्वार्थनिरपेक्षतेंत मुळींच चलबिचल झाली नसती तर रामभाऊंचें बोलणें शोभलें असतें. पण ती कोणत्याही शेणवी गृहस्थाच्या हातांत आजपर्यंत न आल्यामुळें त्याच्याविषयीं विशेष वाटाघाट करण्याची गरज नाहीं. तरी रामचंद्र बाबाच्या हातांत थोडीशी सत्ता आली न आली इतक्यांत उभयतां बंधूंमध्यें फूट पाडून त्यानें आपला पराक्रम दाखविला नाहीं असें नाहीं.

७८ व्या पृष्ठावर शेणव्यांस आपल्या घरीं चित्पावन वगैरे ब्राह्मणांस ठेवणें बरोबर वाटत नाहीं कारण आपणांस ते वडील समजतात, व ह्मणूनच महाराष्ट्र ब्राह्मणांबरोबर व्यवहार ठेवण्यास त्यांचें मन फारसें घेत नाहीं, अशी पोकळ आढ्यता शेणव्यांची रामभाऊ वर्णन करितात; व मत्स्यादिक

आपण खातों हें महाराष्ट्र ब्राह्मणांस जाणवणें इष्ट नसल्यामुळें ते तसें करीत नाहींत हें खरें कारण दाबून ठेवितात. तशांत बाणकोट्याचें पाणी शेणव्यांस चालतें. तेव्हां महाराष्ट्र ब्राह्मणांस शेणव्यांचे घरीं रहाणें प्रशस्त वाटत नाहीं यांत नवल नाहीं. वर यांस 'रामभाऊ' असें जिकडे तिकडे म्हटलें आहे म्हणून आम्हीं त्यांस वडील बंधुप्रमाणें किंवा बापाप्रमाणें पूज्य मानतों असा आरोप कदाचित् ते आमच्यावर ठेवतील, तर त्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, तशी बुद्धि आमच्या तर मनांत नाहीं. तरी तशा बुद्धीचा आमच्यावर आरोप करून जर त्यांस विशेष समाधान वाटेल तर तो त्यांनीं खुशाल करावा, आमचें ना नाहीं. लखबा दादा वगैरे मंडळीस 'दादा' 'बाबा' वगैरे शब्द लावण्याचें कारण हेंच कीं, महाराष्ट्र ब्राह्मणांस ब्राह्मणत्व त्यांचें कबूल नसल्यामुळें पंत व राव हे शब्द लावणें प्रशस्त वाटलें नाहीं, ह्मणून दादा बाबा वगैरे शब्द लावून त्यांचा बहुमान करिवला. ब्राह्मणव्यतिरिक्त जातींस हे शब्द जोडण्याचा संप्रदाय देशावर आहे त्याचा शोध रामभाऊंनीं करावा म्हणजे खात्री होईल. रस्त्यावर जर एखादा शूद्र किंवा ब्राम्हणव्यतिरिक्त गृहस्थ आढळला तर त्यास 'काय दादा, काय बाबा' अशा रीतीनें प्रश्न करण्याचा आम्हा

महाराष्ट्र ब्राम्हणांचा तर सर्वत्र संप्रदाय आहे म्हणून जो आम्हांस रस्त्यावर भेटला त्याच्या विषयीं काय आमची पितृबुद्धि असत्ये? शेणव्यांत कदाचित् वाडी प्रांतांत किंवा बेळगांवांत अपरिचिताचा बहुमान करण्याचा कांहीं विलक्षण संप्रदाय असेल. पण हल्लीं मुंबईत तरी दुसरा आहेसें वाटत नाहीं. शेणव्यांचें ब्राम्हणत्व महाराष्ट्र ब्राम्हणांस कबूल नाहीं म्हणून महाराष्ट्र ब्राम्हणांवर शेणव्यांस चिडतां येत नाहीं. बोलून चालून शेणवी आले परदेशांतून. ते ब्राम्हण असतील किंवा नसतील. त्यांची चौकशी आम्हां महाराष्ट्रांस कशास हवी. आमचा त्यांच्याबरोबर कन्याव्यवहार झालेला नाहींच. शेणवी आपला देशत्याग करून आल्यामुळें या देशांत त्यांस उपाधपण दुसऱ्यास द्यावें लागलें म्हणून उगीच चुरमुरे भाजीत बसण्यांत हांशिल नाहीं. एखादा गृहस्थ जर आपला गांव सोडून दुसऱ्या गांवांत जाऊन राहिला तर त्याच्या पूर्वीच्या उपाध्याचा हक्क जाऊन नवीन उपाध्याचा हक्क त्याच्यावर येतो ही चाल आमच्या महाराष्ट्र देशांत तर सार्वत्रिक आहे. आजपर्यंत शेणव्यांचें उपाधपण महाराष्ट्र ब्राम्हणांनीं केलें. आतां क्वचित् कित्येक शेणवी महाराष्ट्र ब्राम्हणांचा उपमर्द करण्यासाठीं आपल्या जातींतील नवीन भिक्षुकांस दक्षिणा चार

चार आणे किंवा आठ आठ आणे देतात व महाराष्ट्र ब्राम्हणांचे हातांवर ४ पैसे ठेवितात हें खरें आहे. तरी सर्व शेणवी महाराष्ट्र ब्राम्हणांचे याप्रमाणें उपकार विसरून गेले असें नाहीं. ज्याप्रमाणें पारशांस नवसारींतील गुजराथी लोकांनीं आश्रय दिला त्याप्रमाणें शेणवी जर सारस्वत खरे तर त्यांस महाराष्ट्र ब्राम्हणांनीं आश्रय दिलेला असावा. मयूरवर्मा नांवाचा एक कदंब राजा होता त्यानें आपल्या देशांत कांहीं गौड ब्राम्हणांची कुळें आणलीं असें सह्याद्रिखंडांत आहे. तें रामभाऊच्या दृष्टीगोचर झालेंच असेल. पण रामभाऊंस शेणवी त्रेतायुगांत गोंवा प्रांतीं आले म्हणून हट्टानें सिद्ध करायाचें तें कदंब राजाचे नांव आल्यास साधणें नाहीं. हें जाणून त्यांनीं ही आख्यायिका मुद्दाम छपविलेली दिसते. शालिवाहनाच्या पांचव्या व सहाव्या शतकांत घाटावर पलाशिका ( हीस हल्लीं हलशी म्हणतात ) येथें कदंब राजांचें राज्य होतें व 'वनवासी' ही त्यांची वरेंच दिवस राजधानी होती. कदंब राजांचे जे लेख हल्लीं सांपडलेले आहेत त्यांत प्रायः जैन लोकांच्या देवळांस इनामें दिलेलीं आहेत. मयूरवर्म्याची विशेष माहिती अजून मिळालेली दिसत नाहीं. वर लिहिलेल्या काळांत मयूरवर्म्यानें ब्राह्मण गौड देशाहून आ-

णलें हें संभाव्य नाहीं. दुष्काळादिकामुळें ते त्याच्या राज्यांत येऊन जागा मागूं लागले व त्यानें त्यांस रहाण्यास हरकत केली नाहीं हें ह्मणणें जर शेणवी हे गौड किंवा सारस्वत ब्राह्मण खरे तर अधिक संभाव्य ह्मणावें लागतें. आमचा तर असा तर्क आहे कीं, शेणवी हे मुळचे द्रविडच देशस्थादिकांनीं जैनांच्या सहवासानें मत्स्यादिक सोडून दिले, पण शेणव्यांनीं तें सोडलें नाहीं. तेव्हां अर्थात राजे होते ते त्यांस ब्राह्मणांच्या बरोबरीनें लेखीतनासे झाले. शेणव्यांस राजसंसर्ग विशेष असल्यामुळें वैदिक विद्या नकोशी झाली. ह्मणून त्यांस मुद्दाम करहाटाहून वैदिक ब्राह्मण आणून त्यांस आपलें उपाधपण देणें भाग पडलें. हे करहाटाहून आलेले वैदिक ब्राह्मण कऱ्हाडे. हेच यांचे वाडी वगैरे प्रांतांत सर्वत्र उपाध्ये व देवाचे पुजारी आहेत. नंतर मत्स्यमांस भक्षणाची उपपत्ति करण्यासाठीं शेणव्यांनीं गौडत्वाची व सारस्वतत्वाची तोड शोधून काढून मयूरवर्म्याबरोबर ओढून ताणून संबंध लाविलेला दिसतो. कदंब राजाचे जैनांच्या देवळांस दिलेल्या इनामांचे जर ताम्रलेख अजून आहेत तर या मुद्दाम आणलेल्या गौड किंवा सारस्वत ब्राह्मणांस त्यांतील मयूरवर्मा नांवाच्या एका राजानें दिलेल्या इनामांचे ताम्रलेख अजून बाहेर पडत नाहींत याचें

कारण काय?

८२ व्या पृष्ठावर टीप दिली आहे तींत "नाना शेट" असा पुनः पुनः उच्चार करून एकवचनांत प्रयोग केला आहे व शेणवी जातीचे मयत गृहस्थ झाले आहेत त्यांचीं नांवें वहुवचनांत आहेत. आज सोनापुराच्या संबंधानें मुंबई-कर हिंदूंवर व संस्कृत स्कालरशिपांनीं सर्व महाराष्ट्र देशांतील संस्कृताचा विशेष अभ्यास करून त्याच्या वळावर कालेजांतील अभ्यास चालवूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर नानासाहेबांचे जे उपकार झाले आहेत त्यांच्या शतांश देखील शेणवी किंवा इतर जातींतील मयत झालेल्या गृहस्थांपैकीं कोणाच्या ही हातून सध्याच्या काळीं झालेले नाहींत. नानांची मुलीच्या शाळांस वगैरे मदतही मोठी असे. सोनार जातींत नाना शंकर शेट या नांवाचा मोठा अभिमान वाळगतात तो वरोवर आहे. जर मुंबईकरांत आजपर्यंत इतर हिंदु लोकांची जातिभेद खिशांत ठेवून खरोखर कळकळ वाळगणारा पुरुष झाला हें खरें तर तो एक जगन्नाथ शंकर शेट होय. या पुरूषाची सर करणारा दुसरा आजपर्यंत मुंबईकरांत झाला नाहीं; व हल्लीं ही नाहीं. असें असतां त्यांस पुनः पुनः 'शेट' ठरवून एकवचनांत घातलें आहे तें नाना साहेब जातीचे सोनार असल्यामुळें त्यां-

च्या विषयीं आपल्या सारख्या वडील जातींतल्याची पूज्यबुद्धि काय ह्मणून असावी अशा मतलबानं तर नसेलना? आ-ह्मां महाराष्ट्र ब्राह्मणांचा सम्प्रदाय तर "गुणाः पूजास्थानं" हा आहे. जो गुणवंत असेल तो जातीचा सोनार अ-सो, शिंपी असो, वाणी असो, किंवा चोखा मेळ्याच्याही जातीचा असो, त्याच्याविषयीं महाराष्ट्र ब्राह्मणांची पूज्य बुद्धि असायाचीच. वर लिहिलेला कुत्सितपणा त्यांच्या हातू-न होणें नाहीं.

८२ पृष्ठापुढें १० पृष्ठें पळशांच्या वर्णनांत गेलीं आहेत. पण महाराष्ट्र देशांत ही जात फारशी महत्त्वा-ची नसल्यामुळें आह्मांस तिच्या संबंधानें कांहीं लिहिणें जरूर दिसत नाहीं. नंतर ह्मणजे जवळ जवळ अर्धे पुस्तक झाल्यानंतर देशस्थ आले आहेत. यांच्या वर्ण-नाचीं १६ पृष्ठें. साधुसंत, कवि, प्रसिद्ध पुरुष, जे देशस्थांत झाले त्यापैकीं पुष्कळांचा "इत्यादि"पदांत समावेश केला आहे!

९८ व्या पृष्ठावर प्रल्हाद निराजीसारखें रत्न चुकलें व वोकील आणि देवाजीराव यांसारखे त्यांच्या ऐवजीं आंत शिरले. महाराष्ट्र देशांतील ब्राह्मणांच्या वर्णनांत नववा हिस्सा देशस्थ ब्राह्मणांच्या कपाळीं! आणि देशस्थांच्या

वर्णनांत प्रल्हाद निराजीसारखा हिरा मुळींच चमकत नाहीं! धन्य रामभाऊच्या या "महाराष्ट्र देशांतील ब्राह्मणांचें वर्णन" करण्याच्या शैलीचा!

११० व्या पृष्ठावर चित्पावनांचा साद्यंत इतिहास कळत नाहीं असा शेरा रामभाऊ मारितात. पण शेणव्यांचा तरी कोठें कळतो? परशुराम शेणवी व व्यास शेणवी व त्रेतायुगांत शेणवी परशुरामानें कोंकण वसविलें. या भाकड कथां खेरीज शेणव्यांचा साद्यंत इतिहास तरी रामभाऊंस काय कळला आहे!

११६ व्या पृष्ठावर खाणावळी घालण्यासारखा हलका धंदा चित्पावन करितात असा रोख आहे. पण शेणव्यांच्या काय खाणावळी लोहारचाळींत नाहींत? पावबिसकुटें करण्याच्या धंदा काय उंचा!

११७ व्या पृष्ठावर "आपण होऊन चित्पावनांनीं आपला मान कमी करून घेतला," तो कसा तें समजत नाहीं. याचा अधिक खुलासा पाहिजे होता.

१२१ व्या पृष्ठावर नाना फडणविसानें आपलें लक्ष इंग्रजांच्या विद्या व कला यांकडे ज्यापक्षीं त्यावेळीं लाविलें नाहीं त्यापक्षीं त्यास शहाणा ह्मणतां येत नाहीं, असा सिद्धांत रामभाऊ करितात. इतके शेणवी रामभाऊंच्या

ह्मणण्याप्रमाण व्यासाच्या व वाल्मीकीच्या कुळांत जन्मलेले वेंगुर्लें प्रांतीं व मालवण प्रांतीं नानांचे वेळीं होते, ते वडील असतांही त्यांस ही स्फूर्ति होऊं नये हें विलक्षण नाहीं काय? नाना फडणीस तर रामभाऊंच्या ह्मणण्यावरून अनार्य ईजिप्शियन. विद्यांचे प्रवाह सर्व शेणव्यांचे व विद्यांचें निधान जें वेद त्याचें रक्षण करण्यास शेणव्यांनीं निषिद्ध मत्स्यभक्षणही केलें! तरी विद्या व कला शेणव्यांस सोडून गेल्या व इंग्रजांत राहिल्या हें कसें?

१३९ व्या पृष्टावर चित्पावनांच्या "हातीं अधिकार येतांच स्वजातीयांना वाढविण्याकडेस यांचें लक्ष फार असतें" असें रामभाऊ लिहितात. पण शेणव्यांचें काय कमी असतें? खरोखर पाहिलें असतां चित्पावनांनीं असा भेद केलेला इतिहासांत वाचण्यांत येत नाहीं, व हल्लींच्या काळांतही तो आढळत नाहीं. पहिला बाजीराव चित्पावन होता. तरी बुंदेलखंड सर्व कऱ्हाड्यांस त्यानें दिलें. पेशव्यांचे मुतालीक पुरंदरे हे देशस्थ होते ही गोष्ट जगद्विदित आहे. इतकेंच नाहीं तर नाना साहेब पेशवे पुरंदरे यांस फार मानीत व हरएक प्रकरणीं त्यांची मसलत घेत. शिंदे, होळकर व गायकवाड या मऱ्हाठ्यांस वाढविलें कोणीं? चित्पावनांनींच कीं नाहीं? नारो राम शेणवी यास जेव्हां शाहु

छत्रपतीनें मंत्रिपद दिलें तेव्हां जर जातिभेद मनांत असता तर काय पेशवे आड आले नसते? व ते आड आले असते तर शाहु छत्रपतीच्या हातून त्यांस दुखवणें झालें असतें काय? इतिहासांतील ठळक उदाहरणें झालीं. आतां अलीकडील उदाहरणें घेऊं या. मुंबईंत चित्पावनांत थोडेसे पहिल्यानें चढलेले नीळकंठराव दप्तरदार हे होत. यांच्यावर पाठीमागें एकदा ब्र्याच शेणवी लोकांनीं किंवा इतर लोकांनीं हे जागा ब्राह्मणांस देतात असा गिल्ला केला होता असें दिसतें. हे वढतीच्या कामांत जातिभेद ठेवीत असत कीं कसें हें त्यांच्या कारकीर्दीत वाढलेले जे पळशे, शेणवी, सोनार व पारशी आज कित्येक मुंबईंत आहेत त्यांस विचारावें. चित्पावनांचें नीळकंठरावांनीं नुकसान केलेलें नाहीं असें नाहीं. सारांश नीळकंठरावास हपीसाच्या कामांत जातिभेद ठाऊक नव्हता. इतर इंग्रज वगैरे कामगारां प्रमाणें जो आपले हुकुमाप्रमाणें हपीसांतील काम करी त्याच्यावर त्यांची बहाल मर्जी असे. हल्लीं रा. रा. वामनरावजी मोडक बी. ए. एथील हैस्कूलचे प्रिन्सिपाल हेही चित्पावन आहेत. याच शाळेंतील कित्येक शेणवी बी. ए. यांस आश्रय देऊन यांनीं चढविलेलें रामभाऊंस माहीत नसावें हें एक नवल होय. शाळेंत नेहमींच्या जागा रिकाम्या

झाल्या, तेव्हां कित्येक कऱ्हाडे व शेणवी बी. ए. त्यांस देखील कायम केलें कोणीं? वामनरावजींनींच कीं नाहीं? जर चित्पावन हा भेद वामनरावजींच्या मनांत वागत असता तर जे शेणवी वगैरे इतर जातींचे बी. ए. होते त्यांस जागा मिळाल्या असत्या काय? पुण्यांतील हैस्कूलचे हेड मास्तर पंडित कुंटे चित्पावन आहेत तरी त्यांनीं कायस्थांस व मऱ्हाठ्यांस मास्तरांच्या जागा देण्यास पाठीपुढें पाहिलें नाहीं. याच तराजूनें जर शेणव्यांस तोललें तर ते किती उतरतात तें पाहूं या. सावंतवाडींत कारभारी शेणवी होते. त्यांनीं ब्राह्मण जातीच्या एका तरी पुरुषास एखादी चांगल्या अधिकाराची जागा दिल्याचें उदाहरण जर रामभाऊ दाखवितील तर आह्मांस खरोखरच आनंद होईल. येथील एका प्रायव्हेट शाळेची हेडमास्तरशिप शेणवी मिळावा ह्मणून वर्षावर भिजत ठेवली होती ती कोणीं? त्यांत एखाद्या चित्पावनाचा तर हात नसेलना? मुंबईतील व्यापाऱ्यांचीं हपिसें घ्या. नांवाजलेली निकल कंपनी, ग्रेहाम कंपनी, फिनलीमूर, फ्लेमिंग कंपनी, वालेस कंपनी, वगैरे बऱ्याच व्यापारी कंपन्या आहेत. त्यामध्यें मोठा मोठा पगार कमाविणारी व अधिकारी शेणवीमंडळी कांहीं कमी आहे असें नाहीं.

पण त्यांपैकीं कोणीं ब्राह्मणाचा किंवा इतर जातींचा पाय आपल्या कंपनींत शिरकूं दिल्याचें उदाहरण रामभाऊंनींच दाखवावें ह्मणजे झालें. सारांश विचार केला असतां या संबंधानें प्रायः ब्राह्मणांची जितकी बुद्धि उदार तितकीच किंबहुना त्याच्या पेक्षांही कोती शेणव्यांची असें ह्मणावें लागतें. आह्मांस तर असें वाटतें कीं जितकें जातिभेदानें आपल्या या महाराष्ट्र देशाचें नुकसान झालें आहे तितकें दुसरें कशानेंच झालें नसेल. जातिभेद असला ह्मणजे पुरुषास प्रायः जातीच्या पलीकडेस कांहीं दिसत नाहीं. स्वतःच्या जातीचा असेल त्यास तो "आपला" समजून इतर जातीच्यास "परका" समजतो. असें झाल्यामुळें जात्यभिमान देशाभिमानाची जागा बळकावितो व इतर जातींचा द्वेष असला ह्मणजे तो स्वदेशाचें नुकसान करण्यास पाठीपुढें पहात नाहीं. पेशव्यांचें राज्य बुडालें तेव्हां त्यावेळच्या येथील एका प्रसिद्ध गृहस्थानें पेढे वांटले! असें सांगतात. असें असतां जातिभेदाचा अभिमान राखून सर्व लोक जर त्याप्रमाणें चालले तर "परिणाम खरोखरच सुंदर" होईल असा रामभाऊ उद्गार काढितात. "परिणाम सुंदर होईल" याचा एकमेकांतील द्वेष वाढून प्रसंगीं दून होतील व देशाची धूळ धाणी होईल असा अर्थ असला तर कोण

जाणे. आह्मांस तर वाटतें कीं जाती सर्व एक होऊन जा. त्याभिमान सारा गळून जाईल व महाराष्ट्र इतकाच अभिमान राहील तर फारच चांगलें होईल.

१३९ व्या पृष्ठावर आर्जवशक्ति चित्पावनांत पुष्कळ आहे असा रामभाऊ सिद्धांत करितात व त्यासंबंधानें बराच लांब लचक धर्मोपदेश करितात. एव्हां जे मोठे मोठे चित्पावन लोक विद्यमान आहेत त्यांत तर आर्जवशक्ति असल्याचें दिसत नाहीं. नीळकंठराव दप्तरदार खुद्द प्रिचर्ड सारख्या मुख्य कमिशनराबरोबर किती स्वातंत्र्यानें वागत असत त्याचा रामभाऊंनीं कष्टम हापिसांत शोध करावा. पुण्यांतील प्रसिद्ध नाना साहेब साठे यांच्या स्वातंत्र्याविषयीं देखील चौकशी केल्यास रामभाऊंस बराच लाभ होईल. रावसाहेब मंडलीक यांमध्यें जर तिळभर तरी आर्जवशक्ति असती तर खोतांचा पक्ष उचलून फ्रांसिस साहेबाकडून आपल्या जमिनीचा धारा पांच पांच सहा सहा पट त्यांनीं वाढवून कां घेतला असता? व स्थानिक स्वराज्याच्या संबंधानें नामदार गवर्नर साहेबांनीं त्यांच्यावर डोळे कां वटारले असते? जर आर्जवशक्ति माधवराव रानड्यांमध्यें असती तर वेस्ट्राप साहेबांच्या व इतर अधिकाऱ्यांच्या कलाप्रमाणें वागून आजपर्यंत ते मुनसफा-

च्या जागेवरच रखडते काय? व्हालंटियर लोकांच्या मीटिंग-मध्यें नेटिव लोकांच्या तर्फेनें फिरोजशहा मेहेथ्या सारखे पारशी देखील निर्भिडपणानें बोलले; पण वेस्ट्राप साहेबांस अध्यक्षस्थानीं पाहून फिरोझशहा वगैरे मित्रमंडळी आग्रह करीत असतांही उठून चार शब्द नेटिवांच्यातर्फे बोलतां येत नाहींत असल्या पुरुषांत आर्जवशक्ति विशेष समजावी किंवा कोणाही वरिष्ठ गोरकाय अधिकाऱ्याची पर्वा न करितां लोकहित आपणास वाटेल त्या रीतीनें करणाऱ्या पुरुषाची आर्जवी पुरुषांत गणना करावी याचें रामभाऊंनींच नीट विचार करून उत्तर द्यावें.

स्वार्थनिस्पृहता व जात्यभिमानशून्यता आज चित्पावनांत आहे ती एका तरी शेणव्यांत रामभाऊंनीं दाखवावी. बळवंतराव टिळकांसारखे बी. ए. एल. एल. बी. मुनसफाची जागा मिळत असतां तिच्यावर लाथ मारून इंग्रजी शाळेचा स्तुत्य उद्योग पैशाकडेस मुळींच लक्ष न देतां मनापासून करितात, व गणेश गोपाळ अगरकरांसारखे एडिटर माधवराव बर्व्यांची वर्तणूक पसंत न पडल्यामुळें तो आपल्या जातीचा हें बिलकुल मनांत न आणितां त्याच्यावर एक सारखें शस्त्र उचलतात. हीं काय चित्पावनांच्या स्वार्थनिस्पृहतेचीं व जात्यभिमानशून्यतेचीं साधारण उदाहरणें?

शेणवी जातीची वसाति आज पुष्कळ दिवसांपासून मुंबईंत आहे हें रामभाऊंस कबूल आहेच. तशांत इंग्रजी विद्येचा लाभ मुंबईकरांस पहिल्यानें झाला व मुंबईंत तिचा प्रसार विशेष आहे. असें असतां पुणेंकर चित्पावन मंडळीप्रमाणें अजून येथील शेणव्यांत धनादिकांकडेस लक्ष न देतां केवळ स्वजनोन्नतीसाठीं विद्याप्रसार करण्यांत शरीराचा सद्व्यय करणारी मंडळी निघत नाहीं हें कसें?

१४१ व्या पृष्ठावर चित्पावन मुलीचा पैसा घेतात हें अधमपणाचें काम कारितात ह्मणून रामभाऊ ह्मणतात. कबूल. पण शेणवी मुलाचा पैसा घेतात हें काय कमी अधमपणाचें काम? पन्नास तोळे सोनें किंवा शंभर तोळे सोनें किंवा रोख पांच हजार रुपये मिळतील तर मुलगी करूं, नाहीं तर नको, असें ह्मणून नवऱ्या मुलाची किंमत ठरविणें व मागितलेलें सोनें किंवा पांच हजार रुपये देण्यास जर मुलीचा बाप कबूल नाहीं तर पुष्कळ दिवसांची मैत्री असली तरी तिच्यांवर लाथ मारणें यांत पुरुषार्थ आहे असें रामभाऊ ह्मणतील काय? हुंडा घेणें हा काय नरमांसविक्रय नव्हे? मुलीचा बाप गरीब असल्यामुळें त्याच्या हातून सालंकृत कन्यादान होण्यास अडचण पडूं नये ह्मणून ह्यानें पैसे घेऊन शास्त्रोक्त रीतीनें विवाह करावा हें

चांगलें किंवा कर्ज काढून समारंभ करावा व नंतर "**शेड्यूल फैल**" करून सावकारास बुडवावें हें चांगलें, याचें रामभाऊंनीं कृपा करून उत्तर द्यावें. शास्त्रावरून पहातां मुलानें मुलीकडे आलें पाहिजे, कारण मुलीचा पक्ष शास्त्रकार अधिक समजतात. या शास्त्राचें उल्लंघन पैसा घेतल्यानें होत नाहीं इतकेंच नव्हे तर उलट या शास्त्रास तेणेंकरून मजबुती येते. हुंडा दिल्यानें तर शास्त्राच्या सौभाग्यास हरताळ लावावा लागतो. सालंकृत कन्यादान करायाचें कोणास? जो वधू मागायास येईल त्यास. ब्राह्म-विवाह हा. वधूच्या बापानें वरास मागण्यासाठीं त्याच्या बापाजवळ जाऊन मुलाची किंमत ठरली ह्मणजे त्यास कन्यादान करणें हें ब्राह्म-विवाहाचें लक्षण नव्हे. हा अपूर्व विवाह होय. **हा शास्त्रोक्त अष्टविध विवाहांत येत नाहीं.** रजोदर्शन येण्याच्या पूर्वीं किंवा रजोदर्शना नंतर लवकर वर्ष दोन वर्षांनींच पति मृत झाला असतां मुलीचें कुंकू पुसून टाकणें व तिच्यावर यावज्जीव पित्रादिकांनीं विषयसुखाशिवाय रहाण्यासाठीं जुलूम करणें हा रामभाऊंचे मताप्रमाणें अधमपणा नाहीं काय? चाळीशीच्या पलीकडेस गेलेल्या पलितप्रायमुंडांनीं विषयवासना खुंटित झाली नाहीं ही सत्रत्र सांगून दहा बारा वर्षांच्या पोरी बरोबर लग्न केल्याचीं उदाह-

रणें शेणवी जातींत नाहींत अशी रामभाऊ उघड प्रतिज्ञा करण्यास तयार आहेत काय? मुलीचा पैसा देणें तो रोखचा दिला पाहिजे असें नाहीं अनेक रीतींनीं देतां येतो.

१४३ व्या पृष्ठावर "चित्पावन शद्ब गाळून टाकण्याचा प्रयत्न केला ह्मणून त्यांत कांहीं तरी वाईट असावें असें रामभाऊ ह्मणतात. आह्मीं तर असें ह्मणतो कीं, असा प्रयत्न चित्पावनांनीं केलाच नाहीं. जर त्या शद्बांत त्यांस कांहीं वाईटच वाटत नाहीं तर तो गाळून टाकण्यासाठीं यत्न कां म्हणून करतील? पण शेणवी शद्ब वापरणें पुष्कळांस वाईट वाटतें असें रामभाऊच कबूल करितात. असें आहे ह्मणूनच 'गौड' किंवा 'सारस्वत' ही शक्कल त्यांनीं शोधून काढली असें ह्मणण्यास कांहीं हरकत आहे काय? रामभाऊंनीं काढलेला न्याय चित्पावनांस तर बिलकुल लागू होत नाहीं. पण ज्या जातीचा त्यांस 'ब्रीफ' मिळाला आहे त्याच जातीस लागू होत असल्यामुळें 'स्वोत्क्षिप्तपाषाणस्य स्वशिरस्येव प्रपातः' होतो. चित्पावन व चित्तपावन हे शद्ब कानास सारखे तरी लागतात. गौड व सारस्वत या शद्बांबरोबर शेणवी शद्बाचा बादरायण संबंधही लावतां येत नाहीं. याच पृष्ठावर चित्पावनांनीं कोंकणस्थ हा शद्ब आपल्या पुरता लाविला असें रामभाऊ ह्मणतात. मन

हें "परमाणु" न्यायशास्त्री समजतात. त्या परकीय परमाणूंमध्यें सहज रीत्या प्रवेश करून आपल्या सांजन दृष्टीनें त्यांतील सर्व निधान पाहून रामभाऊ सारख्या लोकांस अडकल्याशिवाय बाहेर येतां येतें ही त्यांची परमनः प्रवेशविद्या मोठी अचाट व अद्भुत होय. रावसाहेब मंडलिकांच्या मनांत प्रवेश करून ते डाक्टर भाऊंस पित्याप्रमाणें मानीत ही अपूर्व बातमी रामभाऊंस लागली. परलोकवासी पेशवे वगैरे मंडळीच्या मनांत शिरून रामचंद्रबाबाप्रभृति शेणव्यांस ती बापाप्रमाणें मानी हा नवीन शोध केला. सर्व चितपावनांच्या मनांत शिरून वाईट वाटतें ह्मणून चित्पावन शब्द गाळून टाकला व कोंकणस्थ शब्द आपल्या पुरता लाविला ही दांडगी बातमी रामभाऊंनीं आज इहलोकीं जाहीर केली. ही परमनःप्रवेशविद्या आमच्याजवळ नाहीं, त्यापक्षीं आह्मी काय ती आमची मानवी बुद्धि चालवणार. आह्मांस तर असें वाटतें कीं, कोंकणस्थ हें नांव देशस्थांनीं चित्पावनांस दिलेलें असावें, कां तर चित्पावन हे सर्व कोंकणांतील ब्राह्मण. जर शेणवीप्रभृति जाती देशावर राहिल्यानें देशस्थ होत नाहींत तर कोंकणस्थ तरी कां व्हाव्या हें समजत नाहीं. देशस्थ या शब्दांत देशावरील शेणव्यांचा व मऱ्हाठ्याचा समावेश

होत नाहीं, यांत जर देशस्थांचें कांहीं कृत्रिम नाहीं तर कोंकणस्थांत कोंकणांतील शेणवी व मऱ्हाठे यांचा समावेश होत नाहीं, यांत तरी कोंकणस्थांनीं त्या जातींचें काय कोंबडें मारलें? सरस्वतीच्या तीरीं क्षत्रिय वगैरे रहात होते हें रामभाऊच कबूल करितात. एव्हांही "कान्यकुब्ज" वगैरे ब्राह्मण सरस्वतीच्या तीरीं पुष्कळ रहातात. असें असतां सारस्वत हा शब्द ब्राह्मणांसच हल्लीं व त्यांत ही एकाच जातीस नर्मदेच्या उत्तरेस कां लावितात? पण शेणवी हे आपणांस ह्मणवितात सारस्वत; ह्मणून "आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचें तें कारटें." कोंकणस्थांचें चित्त पवित्र आहे यास प्रमाण नाहीं तर सरस्वतीचा प्रवाह शेणव्यांतून वहातो यास तरी प्रमाण काय? भटारखाना चालविणारी व पाणी भरणारी भालवलीकर वगैरे मंडळी जर "सारस्वतां"त येते तर शागिर्दी करणाऱ्या मंडळीस "चित्तपावनां"त घालण्यास काय हरकत? 'पावन' ह्मणजे पवित्र हा अर्थ ओढाताणीचा कसा? या संबंधानें महोत्सवाचा अधिक प्रकाश पडता किंवा महोत्साहाचा (?) थोडासा अधिक व्यय होता तर बरें झालें असतें.

१४६ व्या पृष्ठावर देशस्थांजवळ सह्याद्रिखंड असतें ह्मणून तें त्यांनीं केलेलें असावें असा पाया घालून त्यांतील

निंदा खोटी असली तरी स्तुति खरी असावी अशा प्रकारचें मंदिर शेणव्यांच्या ब्राह्मणत्वाची प्रतिष्टा करण्यासाठीं रामभाऊ उभारतात. पण हा सर्व लेख यांच्या बाकींच्या लेखांप्रमाणेंच निराधार होय. देशस्थांजवळ सह्याद्रिखंड असतें यास प्रमाण काय? यासच जर प्रमाण नाहीं तर तें त्यांनीं केलेलें असा तर्क तरी कसा निघेल? बरें, कबूल केलें कीं सह्याद्रिखंड देशस्थांजवळ असतें ह्मणून तें त्यांनीं केलेलें. त्यामुळें काय कोणी शेणव्यानें पैसे दिल्यामुळें प्रसिद्ध त्रिमंगलाचार्याप्रमाणें एखाद्या लक्ष्मीकामुकानें त्यांत कुकर्म केलें नाहीं असें कोणास खात्रीपूर्वक ह्मणतां येईल? तशांत सह्याद्रिखंड छापण्याच्या कामांत मोठी मदत केली कोणीं? केणी शास्त्री व दणाईत शास्त्री यांनीं. तेव्हां सह्याद्रिखंड देशस्थांचें असण्याचा संभव अधिक कीं शेणव्यांचें असण्याचा. सारांश आमच्या भाऊसाहेबांचे प्रायः सर्व लेख सिकतासेतूंप्रमाणें असतात; त्यांच्यावर पाय ठेवतांच ते ढांसळत जातात.

१४९ व्या पृष्ठावर तर रामभाऊंनीं कमाल करून सोडिली आहे. "ईजिप्त" या शब्दाचें खरें रूप व खरा उच्चार रामभाऊंस माहीत नसल्यामुळें 'जिप्तवान्' (यथा धनवान् शब्दरि यथा कर्तरि) अशी चित्पावन शब्दाची प्रकृ-

ति मानून यांनीं पाश्चात्य अनेकभाषाकोविदांना लाजविलें!! जात्यभिमान तिळमात्र न ठेवितां जें कांहीं आपल्या बुद्धीस खरें वाटेल तें रावसाहेब मंडलीकांसारखे उदार मनाचे महाराष्ट्र ब्राह्मण असतात ते लिहितात. पण गांवस्कर व रामभाऊ या सारखे गृहस्थ व्यास शेणवी, वाल्मीकि शेणवी, परशुराम शेणवी, साबाजी अनंत शेणवी, शिवाजी महाराजांचा मंत्री शेणवी, जिवबा दादा वगैरेनीं राज्यांची राज्यें उभारलीं, रामचंद्र बाबा सारखा सज्जन नाहीं, पेशव्यांनीं सतीची चाल घातली, असले पूर्वापरविरोधी लेख इतिवृत्त अन्यथा करून, अतिशयोक्तीनें ठांसून लिहितात. तेव्हां रावसाहेब मंडलीकांसारख्या चित्पावनांचीं मनें कोतीं कीं रामभाऊसारख्यांचीं मनें कोतीं?

१६० व्या पृष्ठावर शतप्रश्नकल्पलतिकाकारास खांसडे मारले आहेत. ते पाहून पहिल्यानें थोडासा विस्मय झाला होता, तो अखेरीस नाहींसा झाला व माधवास खांसडे मारण्याचें कारण त्याणें शेणव्यांस त्रिकर्मी ह्मटलें हें अशी पुरी खात्री झाली. सह्याद्रिखंडांत काय कमी चुका आहेत? पण त्यांत शेणव्यांची निंदा नाहीं. ह्मणून तें देशस्थांनीं केलें असें ठरवितात व त्यांतील स्तुतिभाग प्रमाण समजतात; व माधवानें शेणवी त्रिकर्मी झाले कारण त्यां-

नीं मत्स्य खाल्ले असा लेख लिहिला ह्मणून त्याची पाण्या-शिवाय उलटी सुलटी करून तो कऱ्हाडा असावा असें अनुमान करितात!!! जर तितकी शेणव्यांची निंदा न येती तर तोच माधव अगदीं वेदवाक्य बनून गळ्यांतल्या ताईताप्रमाणें होऊन गेला असता. माधव सर्वथा अप्रमाण ह्मणून ठरलेंच. तरी कऱ्हाड्यांची निंदा कर्तव्य होती, ह्मणून त्यास एकदेशीय प्रामाण्य देऊन कऱ्हाड्यांस शेणव्यांचे वंशज समजावें लागेल अशी शंका घेतात. रामभाऊ त्यांत कांहीं तथ्य आहे असें मानीत नाहींत, पण उगीच शंका आली ती त्यांनीं दाखल केली. आता आह्मांस देखील या लेखावरून शंका एक येते. शेणवी हे आपणांस ब्राह्मण ह्मणवितात व जेथें हे आहेत तेथें यांचे उपाध्ये व यांच्या देवांचे जाहीर पुजारी कऱ्हाडे आहेतच. तेव्हां हे मुळचे कऱ्हाडे किंवा कऱ्हाड्यांचा बीजाचे असून राजसंसर्गानें किंवा मातृदोषानें मत्स्यमांसभक्षण करण्यास लागले व तसें झाल्यामुळें कऱ्हाड्यांनीं यांस त्रिकर्मी ठरवून मुळचे आपल्या मधले किंवा आपल्या बीजाचे हें ध्यानांत आणिलें व मऱ्हाठे वगैरे क्षत्रियमंडळी होती तिच्यापेक्षां हे थोडेसे अधिक हें दाखविण्यास ब्राह्मण हें उपपद त्यांस जोडायास सांगितलें. ब्राह्मणाचा व क्षत्रिय स्त्रीचा

संबंध होऊन जी संतति होये तीस क्षत्रियांपेक्षां थोडी उंची व ब्राह्मणापेक्षां थोडी हलकी समजण्याचा संप्रदाय सर्व स्मृतिकारांस मान्य आहे. त्रिकर्मित्वामुळें हे ब्राह्मणांपेक्षां हलके झाले व ब्राह्मण हें पद जोडायास लाविल्यामुळें क्षत्रियांपेक्षां हे सहज अधिक झाले. आह्मांस यांचा लेख वाचून जी एक बळकट शंका आली ती येथें निष्कपट बुद्धीनें दाखल केली आहे. अर्थ आहे असें वाटल्यास ही घ्यावी व अर्थ नाहीं असें वाटल्यास टाकावी. आमचा कांहीं आग्रह नाहीं. असो. माधवास खोटा ठरावितात, व 'कदाचित्' कऱ्हाडे शुद्ध झाले असतील असा लागलाच लेख लिहितात. येथील 'कदाचित्' शब्द कसा खुबीनें घातला आहे तिकडे वाचकांनीं थोडीशी नजर अवश्य पोंचवावी. ज्या तोंडानें शेणवी त्रिकर्मी वगैरे माधवाचा निंदापर लेख खोटा ह्मणतात त्याच तोंडानें कऱ्हाड्यांच्या संबंधानें निंदापर लेख आहे तो खरा असावा अशी शंका घेतात. किती हा दुतोंडपणा!

१६४ व्या पृष्ठावर देशस्थांबरोबर कऱ्हाड्यांचा शरीरसंबंध होत नाहीं ह्मणून ह्मणतात. पण ही गोष्ट खोटी आहे. याची प्रचीत पाहिजे असल्यास पंढरपुरीं भाटे व गुर्जर यांच्या विषयीं चौकशी करावी ह्मणजे झालें.

कन्याव्यवहार कऱ्हाड्यांचा देशस्थांबरोबर होतो इतकेंच नाहीं तर कित्येक कऱ्हाडे देशस्थांत अगदीं मिसळून एक होऊन गेले आहेत. पंढरपुरीं भडगांवकर आहेत हे मुळचे कऱ्हाडे. तसेच गोपाळराव मैराळ बडोदें येथील प्रसिद्ध सावकार हेही मुळचे जांभेकर ह्मणजे शुद्ध कऱ्हाडे. कोंकणस्थांबरोबर ही पुणें, मुरूड वगैरे ठिकठिकाणीं कऱ्हाड्यांचा संबंध थोडा बहुत झालेला आढळतो; व अष्टागर प्रांतांत तर तो पुष्कळ होतो.

१७३ व्या पृष्ठावर कऱ्हाड्यांच्या प्रवादाला कांहीं तरी कारण झालें असावें असें रामभाऊ ह्मणतात. असें जर आहे तर शेणवी हे त्रिकर्मी ब्राह्मण असा जो सार्वत्रिक प्रवाद आहे त्यास देखील कांहीं कारण झालेलें असलें पाहिजे. जो न्याय रामभाऊ महाराष्ट्र ब्राह्मणांस लावितात तोच शेणव्यांस महाराष्ट्र ब्राह्मणांनीं लावण्यास काय हरकत आहे? जर शेणवी जातीच्या संबंधानें जे प्रवाद आहेत ते निर्मूल होत तर ब्राह्मणांच्या संबंधानें जे प्रवाद आहेत ते ही निर्मूल असें म्हणण्यास बाध काय? आपल्या लोकांत कुत्सित काढून ग्रामण्य करीत बसण्याचा प्रकार फार आहे ह्मणून रामभाऊंस फार वाईट वाटतें. पण 'मी हसलें लोकां आणि शेंबूड माझ्या नाका' अशी एक

महाराष्ट्र भाषेंत म्हण आहे. शेणव्यांच्या संबंधानें जितके म्हणून प्रवाद असतील तितके सर्व संभाव्य असले तरी ते निंदकांचे व निराधार म्हणायाचे; पण चित्पावन व कऱ्हाडे यांच्या संबंधानें जे प्रवाद असतील ते असंभाव्य असले तरी त्यांमध्यें कांहींना कांहीं तथ्य असावें असा शेरा मारायाचा. जर हा कुत्सितपणा नव्हे तर कुत्सितपणा कोणता? त्याचें रामभाऊंनींच विवरण करावें.

बाळ मंगेश वागळे हे शेणव्यांच्या वर्णनांत प्रथम **बारिस्टर** म्हणून लिहिलें आहे. तें बरोबरच. पण चित्पावनांच्या वर्णनांत दाक्तर कुंटे हे प्रथम **ब्राह्मण एम्. डी.** व कऱ्हाड्यांच्या वर्णनांत श्रीपाद बाबाजी ठाकूर हे प्रथम ब्राम्हण सिविल सर्वंट हें दाखल करण्यास रामभाऊ विसरून गेले. बारिस्टरची परिक्षा कठिण आहे, यांत संशय नाहीं. तरी तिच्याही पेक्षां एम. डी. ची परीक्षा कठिण आहे, व विलायतेंत २१ वर्षांच्या आंत जाऊन इंग्रज लोकांबरोबर मांडीस मांडी भिडवून, त्यांच्याच जन्मभाषेंत त्यांच्यांवर तान करून नौकरी मिळविणें हें करणारा तर हजारांत एक निघेल तेव्हां निघावयाचा. वागळ्यांचा पश्चात् माधवराव रानडे, तेलंग, धुरंधर, गोखले असे बरेच बारिस्टर झाले. परंतु डा० कुंटे यांच्या पश्चात् अझून एक तरी

दुसरा एम्. डी. झाला आहे काय? इतके शेणवी व इतर दक्षणी लोक आज मुंबईंत आहेत. तरी त्यांतून विलायतेस जाऊन, सिविल सार्विस जवळून माळ आपल्या गळ्यांत भगीरथ प्रयत्न करून घालून घेतली असा श्रीपादरावांच्या पश्चात् अझून एक ही कसा निपजला नाहीं? रावसाहेब मंडलीक तर नुकतेच वड्या कौन्सिलचे मेंबर झाले. महाराष्ट्र लोकांत हा मान आज पहिल्यानें मिळाला. अप्रसिद्ध अप्रसिद्ध शेणव्यांची नांवें परिशिष्टांत भाराभर आलीं आहेत. त्यांत ही महत्वाची गोष्ट नीट दाखल झाली असती तर? पण ते चित्पावन पडले ना! सारांश, इतकें देखील जात्यभिमानानें दिसत नाहीं. असल्या गृहस्थानें महाराष्ट्र ब्राम्हणांच्या वर्णनास हात घालणें व 'महाराष्ट्र ब्राम्हणांसंबंधीं जितकी माहिती प्रयत्नानें मिळाली तितकी दाखल केली आहे' असें जाहिरातींत व प्रस्तावनेंत निःशंक व निःसंकोच लिहिणें हें किती मोठें साहस याचा वाचकांनीं व रामभाऊंनींही विचार करावा.

यावरून रामभाऊंच्या पुस्तकाचें साधारण स्वरूप स्थालीपुलाकन्यायानें वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. जर रामभाऊंनी आपले नांव मुखपृष्ठावर घातलें नसतें तर असल्या द्वेषमूलक व कुत्सित लेखाच्या जनकत्वाचा यांच्यावर आ-

रोप निदान आमच्या हांतून तरी झाला नसता; व गांवस्कर महापंडित, त्यांचे परम गुरु दळवी किंवा दशप्रकरणकार केणी शास्त्री यांच्या लेखणीचा हा पराक्रम आह्मांस वाटला असता. 'महाराष्ट्र ब्राह्मणांच्या विषयीं शोध करून माहिती मिळविली' असा रामभाऊ बाणा मिरवितात, पण यांचा शोध लोहारचाळीच्या किंवा जगन्नाथ सदाशिवजी लेनच्या बाहेर झालेला असण्याचा संभव नाहीं. जर थोडासा तरी बाहेर शोध झाला असता तर नागपुरचे हरी महादेव पंडित यांचा कऱ्हाड्यांत समावेश कधींही झाला नसता. अष्टागर प्रांतांत महाराष्ट्र ब्राम्हणांचे एकमेकांत संबंध होतात ही जगद्विदित माहिती ज्यास नाहीं त्यानें महाराष्ट्र ब्राम्हणांच्या वर्णनाविषयीं लेखणी उचलणें हें मोठें साहस आम्हांस वाटतें. वर लिहिलेल्या कुत्सितपणानें पुस्तक भरून 'महाराष्ट्र ब्राम्हणांचें वर्णन' असें भपकेदार व व्यापक नांव देण्यापेक्षां महाराष्ट्र ब्राह्मणांचा द्वेष आंगीं पुष्कळ दिवसांपासून मुरलेला असावा अशी शंका घेऊन जर शेणव्यांचेंच वर्णन केलें असतें व इतर द्वेषमूलक भाग गाळून टाकला असता तर परीणाम 'फारच सुंदर' होता, असा कडू झाला नसता. अखेरीस रामभाऊंस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं मत्स्यमांसभक्षण, म-

हाराष्ट्र ब्राह्मणांचा द्वेष व त्यांस गालिप्रदान उघड करून जर ते व त्यांचे जातिबंधू महाराष्ट्र ब्राह्मणांत मिसळूं पहातील तर तो सुदिन त्यांस कधीं तरी येईल असें वाटत नाहीं. पण लीनता वगैरे गुणांचा आदर करून जर सनदा वगैरे त्यांसच लघुत्व आणणारी सामग्री एकीकडेस ठेवतील व ब्राह्मणत्व जसें काय कोडतांत रुपये खर्चिल्यानें मिळतें अशा समजुतीनें एक हजार पासून पांच हजार पर्यंत रुपये खर्च करण्याच्या पोकळ फुशारक्या मारायाचें सोडून देऊन नंतर एक होण्याचा यत्न करतील, तर त्यांचा हेतु तडीस जाण्यास विशेष आयास पडतील असें नाहीं. महाराष्ट्र ब्राह्मण आपण होऊन त्यांस आपणांत ओढून घेतील असें कालत्रयीं होणें नाहीं. महाराष्ट्र ब्राह्मण व महाराष्ट्र क्षत्रिय हे समुद्राच्या पूराप्रमाणें किंवा गंगेच्या ओघाप्रमाणें आहेत. ज्या लहान मोठ्या जाती क्षुद्र ओढ्यांप्रमाणें त्यांत येऊं पहातात त्या सर्वांस यथाशक्ति व यथाकाल त्यांच्या पोटांत स्थान मिळतें. पण जर शेणव्यांस अलगच रहाणें असेल तर त्यांनीं खुशाल रहावें, आमचें ना नाहीं. इतकें मात्र त्यांनीं खूब ध्यानांत ठेवावें कीं, महाराष्ट्र ब्राह्मणांचा ओघ एकदा जोरानें पसरत चालला ( हल्लीं ही तो हळू हळू पसरत आहेच ) ह्मणजे त्याच्या त्या अनिवार वेगापुढें न नमतां

ताठ्यानें रहाणारे इतर ब्राह्मण ह्मणविणाऱ्या जातींतलि लोक समूळ धुऊन गेल्याशिवाय रहाणार नाहींत. महाराष्ट्र ब्राह्मणांची निंदा करून नंतर त्यांच्याजवळच सनदा वगैरे मागण्यासाठीं तोंड पसरणें हें किती बरें अश्लाघ्य. तरी धन्य त्या महाराष्ट्र ब्राह्मणांची कीं, त्यांच्यामध्यें रामभाऊंसारख्या निंदकांच्या जातीस देखील उदार मनानें सनदा देऊन ब्राह्मण करणारे पुरुष पुष्कळ आढळतात. काय हा महाराष्ट्र भूमीचा महिमा !!!

ता० क०—परिशिष्टांत दाखल केलेल्या ताम्रलेखांच्या संबंधानें चार ओळी लिहिणें जरूर दिसतें. ३५ व्या पृष्ठावर शा० श० ११०९ चा एक शिलालेख दिला आहे, तो ११०९ तलाच असें ह्मणतां येत नाहीं. हाच लेख दुसरे ठिकाणीं (पृ० १७६ Vol. V, J. R. A. S. G. B. & I.) शालि० ११०२ तला असें आलें आहे. जर ११०२ तला लेख ह्मटला तर १०७०, वें वर्ष 'क्षय' असल्यामुळें ११०२ हें वर्ष 'पराभव' होणें अशक्य आहे. त्यापक्षीं तो धडधडीत बनावट असावा अशी शंका येते. अशा प्रकारचे बनावट कांहीं ताम्रलेख शालिवाहनाच्या पांचव्या शतकापासून आढळतात. पांडवांचा नातु

जनमेजय याच्या राज्याचे ही कोणी वैष्णवानें बनविलेले ताम्रलेख विद्यमान आहेत. आतां ११०२ तला लेख शिलालेख आहे खरा. तरी अपरादित्याची पितृपिताम-हादिपरंपरा यांत दिलेली नसल्यामुळें, व लेख काय तो एका लहानशा दगडावर सांपडल्यामुळें इतर सबंध शिला-लेखाप्रमाणें तो दुसरा पुरावा जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत प्रमाण मानतां येत नाहीं. तशांत आंतील 'अपरादित्या-'चा आगापिच्छा ही बरोबर समजत नसल्यामुळें, या लेखा-चें प्रामाण्य फारच सावधगिरी राखून स्वीकारलें पाहिजे. पंडित भगवानलाल यांनीं ११०२ बद्दल ११०९ शक वाचला आहे तो संवत्सराची उपपात्ति करण्याच्या हेतुनें तर तसा वाचला नसेलना? तेव्हां सर्व कच्ची हकिकत स-मजून खात्री झाल्याशिवाय ११०२ तल्या शिलालेखावर विश्वास ठेववत नाहीं. जरी क्षणभर हा शिलालेख अस्स-ल लेख मानला तरी त्यावरून शेणव्यांचे ब्राह्मणत्वास यत्किं-चित् ही बळकटी येत्ये असें आह्मांस वाटत नाहीं. 'पै' किंवा 'पैप्रभु' हें नांव देशस्थांत किंवा इतर जातींत मुळींच नसून शेणव्यांत मात्र आहे हें पहिल्यानें सिद्ध झालें पाहिजे. समजा कीं अनंत पैप्रभु शेणवी होता हें कबूल केलें. तरी याच लेखावरून तो 'सांधिविग्राहिक' ह्म-

णजे वकील होता हें उघड होय. वकीलपणा व ब्राह्मणत्व यांमध्यें व्याप्यव्यापकभावाचा अंगीकार केल्यास सर्व वकील ब्राह्मण होतील व कायस्थांस ही ब्राह्मणत्वाचा टिळा लावावा लागेल. तें रामभाऊंस इष्ट असेलसें वाटत नाहीं. परिशिष्टाच्या पहिल्या पृष्ठावर आरंभींच 'उपनांवें किंवा इतर कांहीं स्पष्ट खुणा' नाहींत, तरी १२१२ च्या 'पूर्वीचें पुष्कळ लेख सारस्वत ब्राह्मणांच्या संबंधानें आहेत' असें रामभाऊ म्हणतात तें थोडेंसें विसंगत दिसतें. 'उपनांवें किंवा इतर स्पष्ट खुणा' जर नाहींत तर लेख शेणव्यांचे म्हणण्यास तरी प्रमाण काय? १२१२ चा ताम्रलेख आहे, त्यांत ब्राह्मणांच्या ४० नांवांत "महाळूभट्ट"असें एक नांव आहे व "महाळू" हें नांव क्वचित् शेणव्यांत येतें ह्मणून ठाणे जिल्ह्यांतील "अणजोर" हा गांव शेणव्यांनीं दान दिलेला!!! ही न्यायशास्त्राची पद्धति अपूर्व खरी. या रस्त्यानें गेल्यास नुकतेच मयत झालेले विलायतेंतील प्रसिद्ध सालिसिटर जनरल सर जॉन होळकर (Sir John Holkar) यांस होळकर सरकारचे भाऊ बंध ठरऊन त्यांच्या मालमत्तेवर हक्क सांगण्यास श्रीमंत तुकोजीराव होळकर यांस रामभाऊंच्या हातून मदत यथाशक्ति व यथामति होईल असें म्हटल्या शिवाय गति नाहीं. वाडी प्रांतांत

कऱ्हाड्यांमध्यें "महाळू" नांव नाहीं असें रामभाऊ सत्य करून सांगूं शकतील काय? कऱ्हाड शेणव्यांचें ज्या पक्षीं उपाध्ये त्यापक्षीं त्यांच्यापासून शेणव्यांनीं हें नांव घेतलें असावें असें ह्मणण्यास काय प्रत्यवाय आहे? तिसरा ताम्रलेख रामभाऊ शेणव्यांचा ह्मणतात कारण त्यांत "पौम्निभट्ट" व 'मांगेशीपुत्र' ही नांवें शेणव्यांचीं असून जेथें हा ताम्रलेख सांपडला तेथें वस्ती मुख्यत्वें शेणव्यांची आहे!!! जी गाति 'महाळू' या नांवाची तीच पौम्नि या नांवाची. कोचरें येथें कऱ्हाड्यांची ही वस्ती बरीच आहे हें रामभाऊंस देखील कबूल करावें लागेल. असें जर आहे तर ताम्रलेखांतील दान सनदा वाळगण्याची ज्यांस मुळींच गरज नाहीं तसल्या कऱ्हाड्यांस मिळालेलें असण्याचा संभव अधिक किंवा कऱ्हाड्यां जवळून व त्यांच्या बांधवांजवळून सनदा मिळवून त्याच्या बळावर आपलें ब्राह्मणत्व शाबीत करूं पहाणाऱ्या शेणव्यांस मिळालेलें असण्याचा संभव आधिक, याचा विचार रामभाऊंनींच करावा. 'मांगेशीपुत्र' यांतील 'मांगेशी' हें रामभाऊंनीं स्वतः शुद्ध केलेलें. त्यांच्याच ह्मणण्याप्रमाणें छापलेलें नांव 'मांदेशी' आहे. रामभाऊंनीं "मांदेशी" बद्दल "मांगेशी" वाचण्याची शक्कल तर मोठी नाजूक काढली खरी! तरी तिच्यापासून खरोखर कांहींच

इष्टसिद्धि होत नाहीं, कारण देवाचें नांव ईकारांत 'मांगेशी' असें हल्लीं आहे किंवा पूर्वीं तरी होतें असें ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं. जर रामभाऊ शेणवी नसतां शिंपी असते तर याच ताम्रलेखावरून आपल्या जातीचें ह्मणजे शिंप्यांचें ब्राम्हणत्व सिद्ध करण्यास ते न चुकते असें आह्मांस वाटतें. याच ताम्रलेखांत (पृ० ३, ओळ ६) "नामदेवभट्टपुत्रविठ्ठलभट्टस्य वृत्तिरेका" असें आलें आहे. "नामदेव" हें नांव तर मुळचें शिंप्यांचें. 'बहिरी' किंवा 'भैरी' नांव शिंप्यांत पुष्कळ येतें, व याच पृष्ठावर तिसऱ्या ओळींत "बाहरिभट्टपुत्रमहादेवभट्टस्य" असें आलें आहे. या लेखावरून शिंप्यांसच ब्राह्मण ठरवितां येतें असें नाहीं, तर "बोहरि" ही ब्राह्मण ठरतात! "बोहरि" येथील 'बा' वरची मात्रा घांसून गेली असावी किंवा एखाद्या दुष्ट कऱ्हाड्यानें किंवा चित्पावनानें ती मुद्दाम घांसून टाकली असावी इतकें ह्मटलें ह्मणजे झालें. असें ह्मणण्यांत कांहीं अशक्य किंवा असंभाव्य नाहीं. ज्या ताम्रलेखावरून ज्या रीतीनें शेणव्यांस कोचरें गांव दान दिलेला रामभाऊ ठरवितात त्याच ताम्रलेखावरून त्याच रीतीनें तो गांव शिंपी व बोहरी यांस दान दिलेला असून त्या दोन जाती पेशवाईच्या पूर्वी ब्राह्मणांत मोडत असत असें ही ठरविण्यास अडचण पडत नाहीं. जर 'महाळू' व पौग्नि या नांवावरून शेणव्यांस "प्रतिग्रह" होता असें सिद्ध

होतें तर 'नामदेव' व 'वाहरि' या नांवांवरून शिष्यासही होता असें ह्मटल्याशिवाय चालणार नाहीं. जर मांदेशी येथें मांगेशी पाठ समजून शेणवी ब्राह्मण होतात तर वाहरि येथें वोहरि पाठ समजून उद्यां वोहरी लोकही ब्राह्मण ह्मणून भांडायास उठतील. सारांश रामभाऊंनीं फटाटोप पुष्कळ केला खरा तरी "शेणवी" हे ४०० वर्षांच्या पूर्वी याच किंवा इतर नांवानें दक्षिणेंत प्रसिद्ध असून त्यांस ब्राह्मण समजून भूमिदानें करण्याचा संप्रदाय होता हें त्यांनीं आणलेल्या पुराव्या वरून पहातां यत्किंचितही सिद्ध होत नाहीं, कारण अशा विषयीं पुराव्यांत मजवुती जी पाहिजे ती मुळींच नाहीं. रामभाऊंनीं दिलेल्या लेखी पुराव्या-वरून न्याय करण्याचा प्रसंग आल्यास कोणताही न्या-याधीश शेणव्यांची ब्राह्मणत्व पटकावण्याची खटपट ३०० वर्षांपेक्षां विशेष प्राचीन आहे असें ह्मणण्यास धजेल असें आह्मांस तर वाटत नाहीं. शिवाजीसारख्या चाणक्ष पुरुषानें व त्याची मातुश्री जिजाबाईसाहेब या उभयतांनीं पुनः हव्य-कव्य स्वतःचें स्वतः चालविलें व षट्कर्मत्वाचा आग्रह ध-रिला, अशी तकरार हुजुर न येईल असें करावें ह्मणून हुकूम साष्टीकरांस फर्माविला तो पुरा विचार करूनच फ-र्माविलेला असला पाहिजे.

# आमचे दोन शब्द.

'सरस्वतीमंडल' हा ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला व 'केसरी' सारख्या 'दर आठवड्यास ४,३०० वर प्रती खपणाऱ्या' पत्रांतून जाहिरातीही दर अंकीं फडकूं लागल्या, तेव्हां ग्रंथकर्ते रा० गुंजीकर हे विद्वान् व समंजस मनुष्यांपैकीं आहेत यास्तव आह्मांसही त्यांच्या पुस्तकाविषयीं जिज्ञासा झाली, व 'निंदापरिहारा'चा ग्रंथ अवश्य संग्रहीं असावा असें वाटलें. ग्रंथ खरेदी केल्यावर 'जशास तसें' लिहिणाऱ्या गृहस्थांनीं आरंभींच जें लिहिलें आहे त्याची आह्मांस चांगली प्रतीति आली व गुंजीकरासारख्यांच्या हातून अशा वेळीं असा प्रमाद कसा घडला, याचा मोठाच चमत्कार वाटला.

ग्रंथांत काय पाहिजे होतें काय नको होतें याचा थोडा बहुत विचार वाचकांस सादर केलेल्या मागील पृष्ठांत झालाच आहे, व त्यावर हावी तशी योग्य लेखणी ही त्यांनीं चालविलेलीच आहे. तेव्हां त्या संबंधानें आह्मांला अधिक विवरण करण्याचेंही आतां प्रयोजन राहिलें नाहीं. बाकी 'देशस्थवर्गीयांच्या प्रवादांत सत्य कितपत आहे हें माहीत

नाहीं; चित्पावनांचा संबंध ईजिप्ताकडे लागतो त्याजमध्यें दोषार्ह कांहीं दिसत नाहीं; कऱ्हाड्यांच्या प्रवादाला मूळ कांहीं तरी कारण झालें असेल हें उघड आहे; कोंकणामध्यें देवरुख्यांशीं इतर ब्राह्मणांचा पंक्तिव्यवहार होत नाहीं;' असे क्वचित् संदिग्ध व क्वचित् सर्वथा अयथार्थ लेख ठोकून दिले आहेत, त्यांविषयीं विस्तारानें लिहावयास प्रस्तुत आमचें मन घेत नाहीं.

शेणवी हे सारस्वत खरे असें ह्मणण्यास कांहींच आधार नाहीं. रा. रा. रा. भा. यांनीं 'ताजा कलमा'च्या अखेरीस ज्या लेखाचा उल्लेख केला आहे त्यावरून याजनादिक महाराष्ट्र ब्राह्मणांच्या मदतीशिवाय शेणव्यांकडेस स्वतंत्र रीतीनें प्राचीन काळीं तरी होत नव्हतें हें अनुमान निर्बाध निघतें. दोन आज्ञापत्रें सरकारांतून आई जिजाबाई साहेब यांजकडून हिजरी सन ११६७त दिलीं आहेत. त्यांपैकीं एक शेणव्यांनाच आहे व दुसरें मोहिते, मुतालिक, सबनीस वगैरे अधिकाऱ्यांस व इतर लोकांस आहे.

खेरीज सन १७६३त श्री० थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दींत आज्ञापत्र गेलें त्याची नकल खालीं दिली आहे.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ८९ चित्रभानु नाम सं-

वत्सरे कार्तिक वहुल त्रयोदशी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति स्वामी यांणीं साष्टीकर भेद शेणवी वास्तव्य मालवण व गांव गंदाचेहाय प्रांत कुडाळ यांसीं आज्ञा केली.

(शिक्का.) ऐसीजे.——————

वेदमूर्ति ब्राह्मण समस्त वास्तव्य मालवण यांचा व तुमचा कज्जा एक वर्ष पर्यंत लागोन माधव थळी यास तुम्ही हुजुर पाठविला. त्यांणीं गैरवांका समजावून पत्रें नेलीं. त्यावरून समस्त ब्राह्मण मालवणकरी हुजुर आले. माधव थळी हाही आला. तेव्हां श्री आचार्य स्वामी सर्व क्षेत्रींचे समस्त ब्राह्मणांस पूर्वोत्तर मनास आणावयासी सांगितलें. त्यावरून श्री स्वामीकडील व क्षेत्रींचे समस्त ब्राह्मण सदरेस बसोन पूर्वोत्तर मनास आणोन विदित केलें कीं, साष्टीकर यांचे घरीं हव्यकव्यादिक षोडश कर्मे पूर्वी पासून चित्पावन व कऱ्हाडे व देशस्थ ब्राह्मण करीत आले. साष्टीकर आपले आपण चालवूं ह्मणतात हें खोटें; आपण किरवंत ह्मणून ह्मणत होते तेंही खोटें; पूर्ववत् चालत आल्या-

प्रमाणेंच चालवें. कर्मत्रयास मात्र साष्टीकरांस अधिकार. या प्रमाणें निवडून सर्वांनीं विदित केलें. त्यावरून हल्लीं स्वामी कृपाळू होऊन तुमचे ज्ञातीचे घरचीं हव्यकव्यादि षोडशकर्में चित्पावन आदिकरून ब्राह्मण ह्यांणीं पूर्ववत प्रमाणें चालवावीं असें करार करून दिल्हे असे, तुह्मी यांच्या हातून चालवून घेणें, कोणी ही कज्जा न करणें, या गोष्टीस जोवादिगर केलियास पारिपत्य केलें जाईल; हें चित्तांत आणून आज्ञेप्रमाणें वर्तणुक करणें. फिरून येविशींचा त्रोभाट हुजुर येऊ न देणें. येविशीं श्री देवासही पत्र आहे; व जंजिरे सिंधुदुर्गचे मामलेदारास व समस्त लोकांस आज्ञापत्रें सादर आहेत. ते सांगतील त्यावरून कळेल. याची प्रत घेऊन असल पत्र भोगवटीयास ब्राह्मणांकडे देणें.—निदेश समक्ष.

श्री.
राजाराम छत्रपति
हर्षनिधान माधवराव
बल्लाळ मुख्य
प्रधान.

आणखी ४ आज्ञापत्रें—१ समस्त ब्राह्मणांस. २ सिंधुदुर्ग मामलेदारास. ३ जिवाजी विश्राम यास. ४ मुतालीक व सबनिस व कारखानीस व अश्वारूढ व बारगीर व सर नोबत व नाईक व सर्व लोक यांचे नांवें यांस, येणेंप्रमाणें आहेत.

दुसरें, खुद्द या मुंबई शहरांतच वाळुकेश्वरच्या देवालयांत कांहीं शिवाशिवीचा प्रकार झाल्यावरून आपण अधिकारी ह्मणून शेणव्यांनीं देवाचे दारांस कुलूप लावून दिलें होतें. त्याचा खटला फार वाढला. यास्तव इंग्रज सरकारानें धर्माची बाब ह्मणून श्रीक्षेत्र काशी येथें, शास्त्रार्थ ठरविण्यास्तव धाडून दिला. त्या वेळेस काशीस जोनाथन डंकन नामें रेसिदेंत साहेब होता. त्यानें तेथच्या पंडितांपुढें हा प्रश्न ठेविला. तेव्हां पंडितांचा जो अभिप्राय पडला त्यांत असें आहे कीं, 'येथील समस्त ब्राह्मण मिळून दोन महिने पर्यंत चतुष्टाई केली. सर्व ग्रंथ निर्णयाचे आहेत ते अवलोकन केले. त्यावरून हें संमतपत्र पाठविलें आहे कीं, शेणवी यांस ब्रह्मकर्म करावयास **अधिकार** नाहीं व त्यांस **ब्राह्मण** असें ह्मणूं नये. ऐसें असतां शेणवी अनुष्ठानादिक कर्मास कैसे उपयोगीं पडतील? त्यांचा उत्पत्ति–निर्णय सविस्तर धर्मारण्य ग्रंथीं केला आहे. माता ब्राह्मणस्त्री व पिता क्षत्रिय यांपासून उत्पत्ति" इ-

त्यादि. या पत्रावर जोनाथन डंकन साहेबाची सही असून ता० २१ मे सन १७८८, शके १७१० किलक नाम संवत्सर असा सन व शकही आहे. सारांश या गोष्टीस आज जवळ जवळ १०० वर्षें होत आलीं.

यानंतर या कोंकणप्रांतीं शेणव्यांनीं वारंवार बखेडे केले त्या सर्वांचीच टीप कांहीं आज आमच्या पाशीं नाहीं. परंतु सन १८५६ सालीं वेंगुर्ल्यास सहानुष्ठानाचा खटला मातून प्रकरण मुंबईस आलें. तेथें सदर दिवाणी कोडतांत तारीख १ दिजेंबर सन १८५६ रोजीं या ( ३२५६ नंबरच्या ) अपिलाचा निकाल शेणवी हे ब्राह्मण नव्हत असाच झाला आहे. पुढें देवासही प्रायश्चित्त देण्यांत आलें. पाहिजे असल्यास याची नकल येथें मिळण्याजोगी आहे. तेव्हां येथें जडज्यासमवेत विद्वान् शास्त्री असून ठराव होत असत, त्या अर्थीं ते सशास्त्रच असले पाहिजेत.

रा० गुंजीकरांनीं परिशिष्टांत शके १७७२ चीं पुणेंकर इत्यादि ब्राह्मणांचीं संमतिपत्रें ह्मणून कांहीं दाखल केलीं आहेत. पण दाखल करावयाच्या वेळेस हेंही ध्यानांत आणलें पाहिजे होतें कीं हीं मिळविलीं कोणीं? व कशीं? आमच्या ऐकिवांत तर असें आहे कीं, श्रीमंत नाना शेट यांचे आश्रित दामोदर अग्निहोत्री यांनीं महाप्रयासानें संपा-

दन केलीं. मग तीं दक्षिणापरिपूर्ति झाल्याशिवाय असतील?

'देवगिरि ताम्रपटांतून अंशतः उतारा' ह्मणून रामभाऊ एक पुरावा दाखल करितात आणि ह्मणतात—'महाळू भट्ट हें सारस्वतांतील प्रसिद्ध नांव आहे;' व त्यावरून ४० ब्राह्मणांस दिलेला गांव शेणव्यांस दिला असा शेरा मारतात. पण ब्राह्मणांत 'महाळू भट्ट' हें नांव नाहींच काय? पुण्यास नारायण पेठेंत, डोलकर आळींत, वाडेकर यांच्या वाड्यांत, वे० शा० सं० महाळू भट्ट व त्यांचे पुत्र सांबभट्ट असे उभयतां बाप लेक रहात होते. मग त्यांना रामभाऊ उद्यां शेणव्यांत ओढणार नाहींत ना? महाळू हें नांव सकृद्दर्शनीं चमत्कारिक दिसतें इतकेंच; मूळ शुद्धरूप 'महालिंग' हें होय. हें नांव ब्राह्मणांत नाहींच असें समजणें हें मोठें धाष्टर्य दिसतें. त्यावरून शके १२१२ तला प्राचीन लेख पुराव्यास आणणें हें ऱ्याच अविचाराचें काम होय.

परिशिष्टांत आणखीही स्वराज्याच्या वेळच्या सनदा दिल्या आहेत. त्यांत शेणव्यांस इनामें, अग्रहार, वगैरे मिळालेलीं सर्व जाहिर केलीं आहेत. तीं सर्व अस्सल आहेत असें मानण्यास आमचें मन शंका घेते. तें सर्व अस्सल जरी समजलें तरी ब्राह्मणांव्यतिरिक्त इतर जातींस इनामें

वगैरे मिळतच नव्हतीं कीं काय? यास उदाहरण—पुण्यास शेकसल्यांचें संस्थान. तें सर्वप्रसिद्ध आहे. त्यास येरंडवणें हा गांव जल, तृण, तरू, काष्ठ, पाषाणनिधि, निक्षेपसाहित अग्रहार आहे. ह्मणून पेशवे सरकार मुसलमानांना ब्राह्मणांबरोबर षट्कर्माधिकारी लेखीत होतें असें ठरवितां येईल काय?

मऱ्हाठेशाहीच्या दरबाराची रीत रामभाऊंस मुळींच माहीत नाहीं असें दिसतें. कारण, शेखसल्ला, शेणवी वगैरे लोकांस जीं जीं इनामें वगैरे दिलीं आहेत त्यांचा समावेश जमाखर्चीहिशेबांत 'खैरात खर्च' या सदरांत होत असे, आणि ब्राह्मणांस दिलेलीं इनामें 'धर्मादाय' या खालीं मोडत. यावरून जेवढीं इनामें दिलीं तेवढीं सगळीं ब्राह्मणानांच असें मानतां येत नाहीं. शेणव्यांचे जसे तसेच जैन लिंगायत यांचेही स्वामी आहेत. त्यांसही नेमणुका आहेत; वर्षासनें आहेत; इनामें आहेत. ह्मणून काय उद्यां त्यांनीं उठून आपण षट्कर्माधिकारी ब्राह्मण आहों असें स्तोम माजवावें?

परवां येथें हलाई भाऱ्यांच्या महाजनवाडीच्या खटल्यांतही कलियुगांत अत्यंत वर्ज पदार्थ खाणारे शेणवी हे आम्हांपेक्षां कमी आहेत असें वल्लभदास वालजी वगैऱ्यांनीं प्रतिज्ञापूर्वक

सांगितलें. क्यांबेल साहेबांनीं सरकारच्या आज्ञेवरून प्रत्येक जिल्ह्याची खडानखडा माहिती दिली आहे. त्यांत रत्नागिरि–वर्णनांत शेणव्यांविषयीं लिहितांना* 'ते आपणांस पंच गौडांपैकीं सारस्वत ब्राह्मण ह्मणवितात,' असें लिहून 'सर्व शेणवी मत्स्याहार करतात व कांहीं मांसाहार ही करतात' असें साफ ह्मटलें आहे. टी. मोल्सवर्थ साहेबांच्या कोशांत शेणवी त्रिकर्मी असाच शेरा आहे. या व अशा सारख्या अनेक गोष्टींवरून आमचे सुज्ञ वाचकच या गोष्टीचा उलगडा करोत ह्मणजे झालें.

आतां दुसरें माहितीचें सदर पाहिलें तर शेणव्यांच्या वर्णनांत जितका शोध दृष्टीस पडतो त्याचा शतांश ही बाकीच्यांत नाहीं. स्वजातिवर्णनानें ८१ पानें व परिशिष्ट हीं भरवून काढिलीं आहेत. माहिम, मुंबई येथें उपाधपण करणाऱ्या जोशी, याज्ञिक, पळशे मंडळीची झाडून यादी दिली आहे. राहून गेलेल्या माहितींत धर्माजी गणेश सारखे चटसारे दाक्तर लोक आले आहेत. परंतु देवरुख्यांच्या वर्णनांत एका शास्त्री भटाचें नांव शपथेला तरी आलें आहे काय? जगो बापु, राघोराम, यांची शिंदेसरकार

* They claim to be Saraswat Brahmins of the Panch Gaud. All Shenvis eat fish and some Mutton. *Gazetteer vol., X, p. 116.*

च्या वगैरे दरबारांत बडेजाव होती एवढें सांगितलें आहे. परंतु देवरुख्यांतील आमझरवाले यांच्या पश्चात् महाराज शिंदेसरकार यांच्या उजव्या हातास बसण्याचा मान कोणासही मिळाला नाहीं हें रामभाऊ लिहावयास मुळींच विसरून गेले!

"महाराष्ट्र ब्राह्मणांचें वर्णन" असें व्यापक नांव पुस्तकास आहे. पण वर्णन पाहिलें तर ३|४ जातींचेंच !! रामभाऊंनीं मुंबईंत तरी महाराष्ट्र ब्राह्मण कोठपर्यंत पाहिले कळत नाहीं. वडाची गादी, नागाचा पाडा, भायखळा, यांवर त्यांची दृष्टि गेलीच नाहीं! खानदेशांतले प्रसिद्ध ब्राह्मण आभीर आणि आश्वलायनसूत्री 'बोरकांटे' यांविषयीं एक अक्षर नाहीं. बागलाणांत 'बागलाण' ब्राह्मण आहेत. नंदरबार, नागपुर येथें मानवसूत्री चरक ब्राह्मण आहेत. भडगांवास व नाशिकास वाराहसूत्री मैत्रायणी ब्राह्मण आहेत. शहादे, सिद्धपुर येथें रनावट म्हणून ब्राह्मण आहेत. पैठण, टोंके, नगर, इकडे कास्थ म्हणून ब्राह्मण आहेत. या खेरीज गोवर्धन (गोळक) चहूंकडे आहेत ते वेगळेच. या सर्व महाराष्ट्र ब्राह्मणांविषयीं एक ओळ देखील लिहिली नाहीं. व आम्हांत किरवंत असें कोणी म्हणवीत देखील नाहीं त्यांविषयीं चार ओळी भरक-

टल्या आहेत, आणि शेणव्यांनीं सगळें वुक भरून टाकलें आहे! हा सर्व निष्पक्षपातीपणाच काय?

ओढून चंद्रवळ आणून पळशांना यजुःशाखीय वाजसनेय केले आहेत, व त्यांवदल परवां कोडतांतले निवाडे झाले आहेत ते रामभाऊंना अप्रमाण आहेत. खरे यजुःशाखीय वाजसनेय मुंगी-पैठण, पुणतांबे, इकडे महान् महान् विद्वान् झाले त्याविषयीं कांहीं एक माहित नाहीं. तात्या शास्त्री मातुल ठाणकर यांसारखे वैयाकरण आज १०० वर्षांपूर्वीं त्या प्रांतांत कोणी नव्हते. श्रीमंत होळकर सरकारकडे अप्पा शास्त्री दानाध्यक्ष वाजसनेय यजुःशाखीयच आहेत. आज दोन पिढ्या त्यांच्या घरीं हत्ती झुलतो तें रामभाऊंस विदित नाहीं! भास्कराचार्य धर्माधिकारी पुणतांवेकर त्यांचे पुत्र केशवाचार्य हे तर अपर सूर्यच होते. यांचे नृसिंह चंपू, जीवत्पितृनिर्णय, अंत्येष्टीवर वगैरे ग्रंथ सर्वमान्य आहेत. त्यावदल रा० गुंजीकरांस काय अपूर्व माहिती आहे कळत नाहीं. बाकी कऱ्हाड्यांच्या वर्णनांत 'पाध्ये' हे नीच आहेत अशा मजकूराचा लेख लिहिल्याबदल येथील गुर्जर पाध्यांनीं त्यांना खडसाहून दोन पत्रें लिहिलीं, तेव्हां त्याचा जाव मोठ्या शिताफीनें देऊन रा० गुंजीकरांनीं पाठपोठ दोन पानें मोठा निबंधच लिहिला आहे.

त्यांत ह्मटलें आहे कीं, "लोकांमध्यें द्वेषभाव वाढूं नये, होईल तितकें सर्वांचें सख्य व्हावें हेंच मी आज वीस वर्षें प्रतिपादन करीत आहे, व तसें घडवून आणण्याविषयीं होईल तितका सत्य स्मरून मी प्रयत्न करीत आहें." वा-हवा! २० वर्षें प्रयत्नानें डोंगर पोखरून सर० मंडलासा-रखा उंदीर निघाला हेंच कां फळ?

अस्तु. जातिभेदाचा उगीच वाद घालून शुष्क कलह करीत बसणें हें प्रस्तुत समयाला अगदीं अनुचित. या सं-बंधानें आह्मांला आणखी पुष्कळ लिहावयाचें होतें. परंतु नाना अडचणी आल्यामुळें या पुस्तकास आधींच विलंब झाला आहे. यास्तव हें लिहिणें येथेंच पुरें करितों. यावर आशंका वगैरे कोणास आल्यास त्यांनीं आमच्या नांवें खुशाल पत्रव्यवहार करावा.

वार्ताहरकर्ते.

मुक्काम मुंबई, ता. १।१०।८४.

| | 2 | As. |
|---|---|---|
| Womanish or how I married my boy and girl............. | | 8 |

| | आ० | पै० |
|---|---|---|
| अग्निक्रीडा चमत्कार | २ | ० |
| वज्रेश्वरी | ८ | ० |
| पंढरीचा विठोबा ( पद ) | १ | ० |
| गंगालहरी ( टीकेसहीत ) | ४ | ० |
| वीरपत्नी प्रत्येक अंकास | ३ | ० |
| आर्यनीतिसुधा ( भगवद्गीतेंतील वेंचे) | १ | ० |
| साध्वी स्त्री | ० | ६ |
| श्री पांडुरंगाच्या काकड व शेजारत्या व मौंजी, विवाह अष्टकें इ० इ० | ३ | ० |

वरील पुस्तकें मुंबईंत 'फ्यामिली प्रिंटिंग प्रेस' मध्यें विकत मिळतील. टपाल हशील प्रत्येक पुस्तकास अर्धा आणा जास्त पडेल. टिकीटा वर्तवळ्यासह पाठवाव्या. नॉट पेट पत्र घेतलें जाणार नाहीं.

# वार्ताहर

प्रत्येक रविवारीं प्रात:काळीं प्रसिद्ध होत असतें.

( वर्षाची किंमत अवघा एक रुपया. )

या पत्रांत, जगांतील निरनिराळ्या भागांवरच्या शेलक्या बातम्या, स्वदेशांतील ताज्या व निवडक वर्तमानें, काळ्या गोऱ्यांचे होणारे सामने अर्थात् जुलुमांच्या गोष्टी, एखाद्या देशस्थितीच्या विषयावर थोडक्यांत चटकदार असा निबंध व एखाद्या संस्थानाची ऐतिहासिक माहिती, ह्या सर्व गोष्टींचा यथावकाश समावेश होत असतो. मूळ पत्रकांत रिकाम्या नोटिसा नसतात. वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलीं नांवें पत्त्यासह खालीं सही करणाराकडे मुंबईंत 'फ्यामिलि प्रिंटिंग प्रेस,' नं० १९६ फणसवाडीमध्यें पाठवावीं. ट० हं० एक रुपया.

**बाळजी कृ. रघुनाथजी.**